विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| कार्यकारी संपादक | : | श्री. मोहन पाठक |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००३ |
| वर्ष | : | तिसरे |
| अंक | : | २ |
| पृष्ठे | : | ३८ पृष्ठे |


**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ६५**

MH 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ



# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष/अंक २/जानेवारी २००३

## संपादकीय

### नवीन वर्ष चिंतनाचे जावो !

पुन्हा एकदा भिंतीवरचे कॅलेंडर बदलले. पूर्वी या पानगळीच्या दिवसात झाडांची पाने गळत. सारा निसर्ग कात टाकून … पालवीच्या प्रतीक्षेत मग्न होई. आता निसर्ग भिंती भिंती वरची कॅलेंडर्स बदलून कात टाकतो. एकतीस डिसेंबरच्या म…रात्री अचानक जुने वर्ष काळाच्या उदरात गायब होते आणि 'हॅपी न्यू इअर'च्या कर्कश गदारोळात आपण नवीन वर्ष आलं असं मानतो.

उगवत्या सूर्याला सगळं जग वंदन करतं. पण मावळत्या दिनकराला अर्घ्य देणारे प्राचीन भारतीय पूर्वज आठवले की गेल्या वर्षातल्या आशा निराशाचा एक लंबक मनात हिंदोळल्याशिवाय रहात नाही. नवे सूर्य जुन्या सूर्यांचे संदर्भ विसरत चालले आहेत, असा हा 'टेक्नॉलॉजी ग्रस्त' काळ आहे. पण गेल्या वर्षी बाबूजी गेले, अनेक कर्तृत्ववान साहित्यिक गेले …णि मावळणाऱ्या सर्वांसाठी वारंवार हात जोडावे लागले. एक पिढी मावळत चाललेली पाहिली की मनात जे वाटतं ते …ब्दात सांगता येत नाही. बाबूजी गेले आणि अवघे गीतरामायण कानात गुंजत राहिले. दिवसे न् दिवस यांच्यासारखी मोठी …णसं होणार नाहीत ही जाणीव होत जात आहे. एक तर आपण क्षणा क्षणाला वृद्ध होत असतो म्हणून असे जाणवत असावे …च्या या जातकुळीची कर्तृत्वेच उभी राहत नाहीत म्हणून असे असावे. पण संस्कार भारतीच्या कार्यक्रमात ज्यांच्या पाया …लो ते अशोककुमार, केळव्याच्या संमेलनात ज्यांना नमस्कार करून गहिवरून आलं ते पु.ल. अशा आठवणी आता मनात निर्माण होण्याच्या जागा कमी होत चालल्या आहेत. पु.लं. चाच संदर्भ द्यायचा तर 'त्यांच्या पायावर डोके ठेवून कृतकृत्य व्हावे, कर्तृत्वाला सलाम करावा, त्यांच्या आशिर्वादाने आपले अस्तित्व अर्थपूर्ण करावे असे पायच उरले नाहीत!'

जाणाऱ्या वर्षाने या सर्व नाव्यांबद्दलची कृतज्ञता मनात दाटून आली. तरीही माणूस आशेने बद्ध असतो. पुढचे वर्ष अधिक चांगले जावे, जाईल या आशा त्याच्या मनातील भूतकाळाच्या राखेत मूळ धरू पहातात. म्हणूनच सरावाने नवीन वर्षांच्या शुभेच्छा आपण देतो. जिवंत माणसाचा हात हातात घेऊन प्रेमभराने व खऱ्या भावनेने दिलेल्या या शुभेच्छा मला अधिक उबदार वाटतात.

दिशा वाचणाऱ्या, दिशाबद्दल मनमोकळ्या प्रतिक्रिया देणाऱ्या परिचित अपरिचित वाचकांना, लेखकांना व सर्व …शातील सहकाऱ्यांना नवीन वर्ष अधिक दिशापूर्ण जावो, लेखन चिंतन मननाचे जावो या शुभेच्छा !




वर्ष तिसरे / अंक २ / जानेवारी २००३

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२ ७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिन्टस,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२ ९१
२५४१ ३५ ४६

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | 'मोडी लिपी : (संक्षिप्त) आढावा आणि अभ्यासास उपयुक्त पुराभिलेख साधन ग्रंथ' | श्रीमती सुनिता गणपुले | ३ |
| २) | मोडी लिपीची माहिती व महत्ती | श्री. श्रीकृष्ण टिळक | १० |
| ३) | सावधान ! कारखाने बंद पडत आहेत | सृष्टी अंकोलेकर | १२ |
| ४) | मराठी लिहायला हवं... बोलायला हवं | श्री. केतन गायकवाड | १५ |
| ५) | श्रीमद्भगवत् गीता (अध्याय १० वा) विभूति योग : | श्रीमती आशा भिडे | १७ |
| ६) | अशोक नायगांवकरांशी दिलखुलास गप्पा | श्री. गीतेश शिंदे | २३ |
| ७) | रात्रशाळा - एक काळाची गरज | श्री. प्र.द. अरदकर | २६ |
| ८) | ऋतूचक्र - खारफुटीची लागवड | डॉ. सौ. माधुरी पेजावर<br>श्री. अमोल पटवर्धन | २९ |
| ९) | नको हा स्त्री जन्म ! | वंदना प्रसादे | ३० |
| १०) | परिसर वार्ता | प्रा. मोहन पाठक | ३२ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# 'मोडी लिपी : (संक्षिप्त) आढावा आणि अभ्यासास उपयुक्त पुराभिलेख साधन ग्रंथ'

*मोडी लिपीच्या अभ्यासक सौ. सुनीता गणपुले यांचा वेगळ्या विषयावरचा व सांस्कृतिक मूल्य स्पष्ट करून सांगणारा लेख. 'दिशा'च्या जुन्या वाचक, आमच्या विनंतीस मान देऊन त्यांनी सदर लेख 'दिशा'साठी बनविला आहे.*

*- संपादक*

**भाषा व लिपी महत्त्व :-**

भाषा व लिपी यांत असलेली ताकद-सामर्थ्य जाणून घेणे हे जिवंत समाजाचे लक्षण होय. तरच तो समाज उन्नतावस्थेस पोहोचतो व इतिहासही जिवंत ठेवतो.

एक माहितीतले उदाहरण लक्षात घेऊ या -

'बनावट वस्तू ओळखण्याचे इस्रायली तंत्रज्ञान मुंबईत' ही आजची (३०.७.०२) वृत्तपत्रातील बातमी. एकेकाळी जगाच्या नकाशावरून पराभूत झालेले यहूदी इस्रायलला परतले तेव्हा त्यांनी प्रथम आपली भाषा व लिपी - 'हिब्रू'चीच कास धरली. इतकी की तिला राष्ट्रभाषेची अभिमानास्पद प्रतिष्ठा मिळवून दिली. अल्पकाळात ती जागतिक महत्पदास चढली. आजच्या विज्ञान व तांत्रिक युगात तिच्या शिवाय अभ्यासकांचे पान हलत नाही. उपरोक्त उदाहरण ताजे आहे.

आपले विचार परस्परांस कळविण्याचे लिपी हे एक साधन आहे. लिपीद्वारा वाङ्मयास स्थैर्य लाभते. पहिले लेखन चित्रलिपीतून झाले. मात्र, ते अपुरे होते. सुमारे ७००० वर्षापूर्वीचा हा काळ असावा. अशोक पूर्वकाळीही लेखनकला रुजल्याचे शिलालेखावरून कळते. म्हणजेच भारतीयांना लिपीज्ञान होते.

**मोडी- लिपीचा संक्षिप्त इतिहास :-**

नेमकी सुरुवात कधी व कशी झाली याबाबत एकमत नाही. मात्र आपले इतिहासतज्ज्ञ व लिपीतज्ज्ञ कै. वि.का. राजवाडे, श्री. ल. श्री. वाकणकर आदींच्या मते,

१. मौर्यकालीन राजे चंद्रगुप्त, सम्राट अशोक काली लिपी अस्तित्वात होती. मोडी लिपीत अपूर्ण वा संयुक्त वर्ण नाहीत. तसेच अशोक लिपीतही नाहीत. जोडाक्षरे, ऱ्हस्व-दीर्घत्व नाही म्हणून ही अशोकाची सुधारित लिपी असावी.

२. दुसरे, ७०० वर्षांपूर्वी यादवकाळी महाराष्ट्रात यादव साम्राज्य सर्वदूर पसरले होते. महादेवरायाच्या पदरी हेमाडपंडित हा महामंत्री होता. त्याने कारभारात अनेक सुधारणा घडवून आणल्या. मात्र, मोडी लिपी लंकेतून आणली हे अमान्य. देवनागरीतच त्याने सुधारणा केली हे मान्य. अपभ्रंश झाला हे लिपीकार अमान्य करतात.

देवनागरीत जो काना वरून खाली काढतात तो शेवटी लेखन वेग वाढविण्यासाठी खालून वर नेण्याच्या प्रयत्नाने मोडीची निर्मिती झाली असावी व ती हेमाडपंताने केली असावी हे शक्य आहे.

३. राजवाडे यांच्या मते कोणत्याही लेखनशैलीत सुवाच्य व जलद असे प्रकार आढळतात. उदाहरणार्थ - पर्शियनांची शिकिस्ता, किंवा रोमनमधील चलती लिपी (रनिंगहॅंड) - सर्वश्रुतच आहे. तद्वतच मोडी ही देवनागरीची जलद लिपी म्हणावी आणि ती हेमाद्रीला सुचली असावी.

४. श्री. वाकणकर मते, शिवकाळात चिटणीस बाळाजी आवजी यांनी ही लिपी तयार केली हे अमान्य. त्यापूर्वीचेही मोडी कागद उपलब्ध असल्याने चिटणीसाने मोडीस वळणदार बनविण्याचा प्रयत्न केला असणे शक्य


आहे.

वर म्हटल्याप्रमाणे, ज्येष्ठ व तज्ज्ञ मतांवरून, श्री. वाकणकर मते, सुस्पष्ट होते की, 'मोडीचा उगम देवनागरीतच आहे व मोडी ही देवनागरीची जलद लिपी आहे.'

**उद्दिष्टे :-**

यादव काळात सरकार दरबारी लिपीस स्थान मिळून तिचा झपाट्याने प्रसार झाला व लिपी जनमानसात रुजली. इतकी की फर्माने, हुकमनामे, निवाडापत्रे, दानपत्रे, इनामपत्रे इत्यादींसाठी हिचा अवलंब केला गेला.

बाळबोध अक्षरे सुटी असून हात उचलावा लागतो. रेषा, काना, मात्रा, वेलांटी, विरामचिन्हे यामुळे वेग मर्यादा पडते. राज्यकारभारात पत्रव्यवहाराचा वेग वाढविण्यासाठी जलद मोडी आवश्यक वाटली व सुरू झाली. उदा.




येथे देवनागरीत ६ ठिकाणी हात उचलावा लागतो तर मोडीत २च ठिकाणी उचलावा लागतो हे स्पष्ट होते.

कालानुसार मोडी लिपीचे शिवकालीन, पेशवेकालीन व आंग्लकालीन असे विभाग पाडता येतील. तुलनेने पाहता शिवकालीन लेखन वाचण्यास कठीण असून पेशवेकालीन अक्षर घोटीव व पेटीदार तसेच वाचनीय असे अभ्यासकांचे अनुभवी मत आहे. मात्र, पुढे इंग्रजी अंमलात इंग्रजीस प्रतिष्ठा मिळून मोडी दुर्बोध होऊ लागली व हळूहळू तिचा अस्त होऊ लागला.

**पुराभिलेख साधन-ग्रंथ :-**

मराठ्यांच्या इतिहासाची पुष्कळ साधने मोडीत असून गणती केल्यास ती ५-७ कोटींवर जाईल. एवढ्या मोठ्या साधनसंभाराचा इतिहासासाठी उपयोग करून घेण्यास मोडी वाचनाचा सराव असणे अत्यंत जरूरीचे आहे. विशेषत: आज ती निकड भासू लागली आहे.

मोडी वाचन करून त्या काळातील वळणे, वेगवेगळे फरक समजावेत, वाचन सराव करावा व त्याचबरोबर त्या साधनांचे मूळ स्वरूप लक्षात यावे म्हणून मूळ मोडीतील अस्सल साधने जाणून घ्यायला हवीत. त्यासाठी झालेले काही पूर्व प्रयत्न लक्षात घेऊ या.

१. ऐतिहासिक पत्ररूपी साधने - या द्वारा ठळक प्रसंग देण्याचा पहिला प्रयत्न १९२३ मध्ये कै. द. वि. आपटे - 'महाराष्ट्र इतिहास मंजिरी अथवा निवडक ऐतिहासिक उतारे' यातून झाला.

२. श्री. आ.बा.जोशी, बारामतीकर, आ. वा. चांदोरकर संपा.त 'शिवशाहीचा लेखनालंकार - १९३४' मधील प्रयत्न. यात आकार २-३ ओळीत व देवनागरीत त्रोटक वर्णन असल्याने मूळ कल्पना येत नाही.

३. गो.स. सरदेसाईकृत 'ऐतिहासिक पत्रबोध' १९३९ मधील प्रयत्न.

४. आपटे ओतुरकरकृत 'साधन परिचय अर्थात मराठ्यांचा पत्ररूप इतिहास, १९४१ २ री. आ. १९६३. यानंतरचे अलिकडचे प्रयत्न.

५. 'मराठेकालीन प्रसिद्ध व्यक्तींची हस्ताक्षरयुक्त पत्रे' - संपा. गो.ग.दीक्षित व वि.गो. खोबरेकर. शासकीय मुद्रणालय, मुंबई, १९६९.

यात ५४ ऐतिहासिक स्त्री पुरुषांनी लिहिलेला हस्ताक्षरयुक्त पत्रसंग्रह असून मराठी इतिहासातील अस्सल मोडी साधने बालबोधीत आणणाऱ्या थोर जाणकार व्यक्ती - कै. वि.का. राजवाडे, का.ना. साने, वासुदेवशास्त्री खरे, द.न. पारसनीस, गो.स. सरदेसाई, तसेच भा.इ.सं. मं.

यांचा वाटा मोठा आहे.

प्रस्तुत ग्रंथात मूळाबरहुकूम सर्व मोडी उपलब्ध करून देऊन बाळबोधीत त्यांचे लिप्यंतर समोरासमोर दिले आहे. त्यामुळे ग्रंथ वाचन सुलभ झाला आहे.

प्रस्तावनेवरून कळते की -

पत्रातील मजकूर कारकून लिहीत. यजमान शेवटचा मजकूर स्वहस्ते करी. त्यामुळे पत्रास प्रामाण्य प्राप्त होई. काहीवेळा प्रारंभी अग्रभागी श्रीकार, दैवताचे नाव असे. न्हस्वदीर्घत्व नसे. लिपीत सलगता असल्याने विरामचिन्हे भासतील तशी दिली जात. पूर्णविराम नसे. शिरोरेघ योग्यजागी नसे. उदा. खरे आणि खेर. आडनावे मोडीमध्ये सारखीच. वाचताना जुळवून घ्यावे लागे.

यादवकालीन कोरला गेलेला उत्कीर्ण लेख मोडीमध्ये उपलब्ध नाही. निजामशाही काळापासून एखाद दुसरा अपवादात्मक अक्षरे आढळते. उदा. ई / इकार. याची सुरुवात केवळ पत्राच्या सुरुवातीस असे. मात्र यादवकाळात ओम् किंवा प्रणव आरंभापासून आढळतो. उदा. 'श.१२२७ मधील यादव रामदेवरायचा काटा (जि.वाशीम) येथील शिलालेख' यावरून दिसते.

शिवकालीन वळण, एकात एक गिरवून लिहिण्याची पद्धत, फारसी शब्द यामुळे वाचनास क्लिष्ट व दुर्बोध असे. उदा. करुनु, देवुनु इत्यादी सरावाशिवाय अभ्यासास अवघड असे.

शिवपूर्वकाळात पत्रे, सनदा यांचे लेखन विशिष्ट पद्धतीने असे. उदा. स्मृती पुराणातून आढळते तसे मानाप्रमाणे असे. 'हेमाडपंती मेस्तक' या स्वतंत्र प्रकरणात लेखनाचे मायने दिले आहेत. तसेच १४ व्या शतकातील गुजराथेत लेखन पद्धती ग्रंथ आढळतात. त्यातून पत्रांचे - प्राचीन राजकुळातील नमुने गहाणपत्रे, क्रयविक्रय पत्रे इ. ची उद्बोधक माहिती मिळते.

शिवकालात रामदासांनी 'लेखन कसे असावे' याबद्दल दासबोधातील एका समासात सुदीर्घ उपदेश केलेला आढळतो. विशेष महत्त्वाची गोष्ट की, स्वराज्यात मनास येईल तसे लेखन अधिकारी करीत म्हणून शिवाजीने 'मायने' ठरवून दिले. सरकारी कामकाजास नियम लावले. तो अंमल शाहूपर्यंत चालत आला. आज्ञापत्रे चिटणीसांकडून जात. त्यावर छत्रपतीचा शिक्का असे. 'लेखन प्रशस्ती' बाळाजी आवजीने रचलेली असल्याने राजपत्रात सुसूत्रता असे. 'सूज्ञ असा' अशी अक्षरे चिटणीसानंतर अष्टप्रधान आपली चिन्हे करीत.

६. 'शिवछत्रपतींच्या पत्रांचे प्रतिरुपदर्शन' संपा. भा. घाटावकर, पुराभिलेखागार, महाराष्ट्र शासन, १९८८.

या अक्षरवाटिकेतून लेखकाने शिवछत्रपतींच्या निवडक पत्रांचे मूळाबरहुकूम त्यांच्या देवनागरी लिप्यंतरासह दर्शन घडविलेआहे. आजवर २०० पत्रे उपलब्ध झाली. म्हणजे कमीच. ही खेदाची गोष्ट. मात्र, संशोधकांचे प्रयत्न अथक. त्यातही शिवछत्रपतींची पत्रे म्हणजे त्यांच्या हस्ताक्षरातील नव्हे तर मुद्रांनी अंकित पत्रे महत्त्वाची.

राज्याच्या कचेरीतून पत्र जाताना 'शिवाजी राजे' नाव असे. ती अस्सल समजावीत !

शिवशाही काळात पत्रलेखन कारकूनाकडून होई. आरंभी 'शिक्का' व शेवटी 'मोर्तब' मुद्रा असे. 'कचेरी पत्रे' व 'खाजगी पत्रे' असे प्रकार असत.

राज्यकारभारविषयक पत्रलेखन विशिष्ट नियमानुसार मोडी लिपीतच असे. प्रथम रेघ काढणे, विवक्षित स्थळी काढणे, तिर्ची पद्धत, मायने, अक्षरे व कोरी जागा इत्यादीस नियम असे.

माथ्यावर 'श्रीकार', 'कुलदैवत' असे. उजव्या कोपऱ्यात प्रतीचा उल्लेख असे. आज्ञापत्र खुर्दखत, हातरोखा, महजर, करीणा प्रकार असत. कळण्यास सोपे.

कार्हीवर साक्ष असे, सही नसे. लेखन हस्तकाकडून असे. मसुदे ठरीव असत. अधिकारी वर्गाचा खुलासा असे.

प्रथम 'मायना' 'मुसलमानी सुहूरसन' असे. तिथी, मिती, शक, इ. चा उल्लेख असे. १६७४ मध्ये शिवराज्यभिषेकानंतर मोरोपंतादी कारकून यांनी 'लेखनसीमा' 'लेखनालंकार' इ. सुधारित वचने सुरू केली.

राज्याभिषेकानंतर 'राजमान्य राजश्री.. सुरू झाले. 'स्वस्तिश्री... पासून शके, संवत्सर नाम, तिथी वार, नाव इ. क्रम असे. मजकूरात फारसी रेलचेल असे.

आज्ञापत्र, अभयपत्रे, इनामपत्र, कौलनामा, करीना, महजर, निवाडापत्र इ. पत्रांतून शेवटी 'रुजू', 'संभत' 'बार' 'पैवस्ती - पावले' तारीख-महिना असे. 'शिक्का' प्रारंभी व 'मोर्तब' शेवटी असे. अशी पत्रे म्हणजे अस्सल समजावी. मोर्तबसूद, लेखनसीमा, मर्यादेयंविराजते शेवटी असे.

शिवमुद्रा- अष्टकोनी, एकवलयी, ५ ओळीत असे. संस्कृतात अनुष्टुभ छंदात असे.

'प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता ।
शाहसूनो: शिवस्यैषा मुद्राभद्राय राजते ॥'

विशेष लक्षात घेण्याजोगी गोष्ट म्हणजे शिवरायांची पत्रे स्वहस्ताक्षरात असल्याचे उल्लेख इंग्रज पत्रव्यवहारातून कळतो. मजकुराहून शेवटची अक्षरे भिन्न असल्याचे कळून येई.

अभ्यासास प्रत्यक्षात निवडक २०/२५ पत्रेच उपलब्ध झाल्याचा उल्लेख लेखकाने (संपा.ने) केला आहे.

७. ''शक व सन यांची तिथी व तारीखवार जंत्री' श.१६५० ते श.१८११ पर्यंत बाळाजी प्रभाकर मोडक. (करवीर येथे मिळालेली ना.म.जोशी. पोथीच्या आधारे सुधारून शुद्ध करून तयार केलेली प्रत) पुणे, चित्रशाळा, कोल्हापूर, इ.स. १८८९ प्रस्तुत संदर्भग्रंथाचा येथे मुद्दाम उल्लेख करणे जरूरीचे वाटले. मोडीच्या अभ्यासकांना शक, सन, तिथी इ.ची माहिती वारंवार लागते. त्यासाठी या ग्रंथाचाच - जंत्रीचाच वारंवार उपयोग करावा लागतो.

१९१५ च्या सुमारास मोडीलिपी चालू ठेवावी की नाही बाबत चर्चा रदबदली होऊन तिला राजमान्यता मिळाली. याच काळी प्राथमिक शाळांतून पहिली ते सातवी या चढत्या क्रमाने अवघड होत जाणाऱ्या 'वाचनमालिका' अभ्यासातून शिकविल्या जात. आज त्या दुर्मिळ ग्रंथ या सदरात जमा झाल्या आहेत. त्या पुढील प्रमाणे होत्या -

१. पटवर्धन, सि.वी.मोडी पुस्तक १ ले. मुंबई, १८८५, पृ. ६८

२. पोतदार, वा.मो.मोडी वाचनसार-१ मुं. १८९५

३. पटवर्धन, सि.वि. मोडी वाचनसार -२ पुणे १८९९ पृ. १४४

४. गोडबोले, म.भा.मोडी व्यवहार पद्धती, १९२९.

तसेच ट्रेनिंग कॉलेज, कोर्ट दरबार यातूनही मोडीचा वापर असे त्यामुळे महत्त्व टिकून होते.

१९५१ साली खेर मंत्री मंडळाने सदर लिपीस अनावश्यक ठरविले व अभ्यासक्रमातून ती काढून टाकण्यात आली. त्यामुळे नव्या पिढीस मोडी लिपीचा परिचय होण्याचा मार्ग बंद झाला.

आंग्ल काळात मोडी लिपीचा मुद्रण कलेत प्रवेश झाला हे विशेष. १८७७ पासून सि.वि.पटवर्धनमाला सुरू झाली होती. तेव्हा अभ्यासक्रमात मोडी लेखन वाचन होत असे. त्याहीपूर्वी १८०२मध्ये 'बॉम्बे कुरियर' मध्ये येणाऱ्या जाहिराती 'मोडी'त असत. शोध घेता आढळले आहे की, सर चार्लस विल्किन्स व विल्यम करे यांनी पंच (Type) तयार करण्याचे अवघड काम केले. व त्यायोगे भारतीय पंचांगे, व्याकरण कोश, भगवद्गीता, हितोपदेश इत्यादींचे मुद्रण केले. त्यांचे वळण अप्रतिम होते (हे संच टाईपस ३ पेट्यांतून असून 'इंडिया ऑफिस' येथे जतन केलेआहेत.)

असा उल्लेख आढळतो.

मोडी वाचनात अनेकदा अडचणी येत. शब्द कोठे तोडायचा ते ठरविणे कठीण असे. तसेच अन्य भाषांच्या प्रभावाने ती दुर्बोध होऊ लागली.

ऱ्हस्व दीर्घ भेद नसल्याने भाषाशुद्धीचा दोष येई. १८६२ पासून ती सुकर करण्याचा प्रयत्न सुरू होऊन शब्द तोडून लिहिणे, विरामचिन्हांचा वापर करणे, यामुळे वेग मंदावला. पण लिपी लेखनाला उपकारक ठरली. तदनंतर वेळोवेळी नामवंतांनी चर्चा घडवून अभ्यासपूर्ण प्रस्ताव मांडल्याचे आढळून येते.

मध्यंतरी पाव शतकाचा खंड पडूनही प्रदर्शने ठराव आणि अभ्यासवर्गाचे आयोजन होऊन जाणकारांनी मोडी लिपी शिकविण्याचा श्रीगणेशा पुण्यात (१९८४ मध्ये) घातला. त्यास उत्तम प्रतिसाद मिळाला. शिवाय मुंबई, नगर येथेही कार्य सुरू झाले. याचवेळी शिकविताना जाणवणाऱ्या उणीवा भरून काढण्याकडे लक्ष लागून विशेष प्रयत्न झाला. तो पुढीलप्रमाणे -

८. 'मोडी लिपी परिचय आणि ऐतिहासिक नमुनापत्रे' - ले. डॉ.म.रा. कुलकर्णी, पुणे, भा.इ.सं. समिती, १९९१ पृ. १८९.

या देखण्या प्रकाशनाचे श्रेय लेखक, तसेच प्रकाशक - डॉ. चिं.ना. परचुरे आणि पुणे विद्यापीठ - इतिहास विभाग याकडे प्रामुख्याने जाते.

सदर ग्रंथात लेखक, प्रकाशकांचे मनोगत, निवेदनासह १ - मोडी लिपीचा उगम व विकास, २- मोडी कागदपत्रांचे अंतरंग दर्शन, ३ - ऐतिहासिक व आधुनिक पत्रांचे नमुने, ४ - ऐतिहासिक शब्दार्थ व सूची, असे भाग असून डॉ. श्रीपतीशास्त्री यांचा पुरस्कार प्राप्त झाला आहे.

मोडी लिपी परिचयावरील आधुनिक काळातील हा प्रमुख व पहिलाच ग्रंथ असून अभ्यसनीय झाला आहे.

१९९१ साली महाराष्ट्राच्या ज्ञानस्पर्शी इतिहास लेखनाकरता दप्तरखान्यातील व संशोधन संस्थांतील दुर्लक्षित, दुर्मिळ साहित्य - मोडी लिपीतील कागदपत्रे यांचे वाचन अत्यावश्यक झाल्याने लोकसत्तेचे तत्कालीन संपादक, ज्येष्ठ पत्रकार श्री. माधव गडकरी यांनी प्रदीर्घ लेख लिहून 'मराठ्यांचा इतिहास व तंजावर, सरस्वतीमहाल, येथील मोडी कागद संदर्भात सत्य परिस्थिती व सद्य परिस्थिती उघड केली. जनतेस आवाहन केले. तेव्हा मुंबईतील वयोवृद्ध, अनुभवी पत्रकार श्री. ग.का. रायकर यांनी 'मोडी शिक्षण प्रसारक मंडळा'चे जू खांद्यावर घेऊन मोडीचे अभ्यास वर्ग चालू केले.

या वर्गातून 'मोडी वाचन आणि लेखन' बाळबोध सं.पा.त के. भि. ढवळे प्रकाशन - चढत्या अभ्यासक्रमाचे - १ ते ५ भाग शिकविले जाऊ लागले. या पुस्तिकांचा दर्जा उत्कृष्ट असून सोपेही वाटत. त्यामुळे शेकडो मोडी जाणकार स्त्री-पुरुष तयार होऊन (बालांपासून प्रौढांपर्यंत) ही एक चळवळच सुरू झाली ती आजतागायत धीमेपणाने - नेटाने चालू आहे.

सदर वर्गातून लेखन वाचन सरावद्वारा जुन्यास उजाळा व नव्यास नवीन ओळख होऊ लागली. जागतिक मराठी परिषदेने (१९८९) आशिर्वाद दिले. श्रीमती मंगला अभ्यंकर सारख्या दात्यांनी मदतीचे हात पुढे केले. मुंबईच्या उपनगरांतूनही मोडी लिपी वर्ग चळवळ फोफावून मोडी प्रेमिकांना जाग येऊ लागली.

याशिवाय कोकण, रत्नागिरी, कोल्हापूर परिसरातूनही प्रसार होऊ लागला.

या ओळखीमुळे गतकाळचे जीवन -इतिहास, संशोधन द्वारा जवळून पाहता यावे हा मूळ हेतू असला तरी दैनंदिन पत्र व्यवहार, जमाखर्च, दैनंदिन्या ठेवणे यास ही लिपी उपयुक्त व सोयीची ठरली. 'मोडी'तील सही कुणास चोरता येत नाही. ही महत्त्वपूर्ण बाब होय.

**स्त्रियांचा सहभाग आवश्यक :-**

स्त्रियांनी मोडी लिपी आवर्जून अवगत करून घ्यावी. दैनंदिन जमाखर्च लिहिण्यापासून ते आपणास हवा तो मजकूर गुप्त राखण्यासाठी डायऱ्या लिहिण्यापर्यंत ही लिपी मददगार होते. दुसरे असे, की कोर्टाचे कागद विशेषत: वारसाची जुनी कागदपत्रे पुष्कळशा घरांतून जुन्या बासनातून पडून आहेत. का? तर मोडी लिपी कळत नाही म्हणून. ही लिपी साध्य केल्यास वारसाची खरी गोष्ट स्त्रीला कळून येईल. आज जमिनीचे केस पेपर्स वाचणारे कुणी मिळत नाही. जाणकारांची टंचाई म्हणून कित्येक (वकीलसुद्धा) शोधात असतात. कमाई करण्यास सध्या हा प्रांत मोकळा आहे. सुशिक्षितांनी इकडे वळणे जरूरीचे. निदान स्त्री हक्क सिद्ध करण्यासाठी तरी स्त्रियांनी मोडी लिपी जाणून घ्यायलाच हवी.

याशिवाय जलद लिपी म्हणून पत्रकारांनीही ती आत्मसात करावी.

मोडीतील कागदपत्रे भारतात व बाहेरही सर्वदूर विखुरलेली आढळतात. याचाच अर्थ मराठी राजे ज्या ज्या प्रांतातून नांदले, राज्यकारभार केला त्या त्या वेळच्या तत्कालीन भाषांचा प्रभाव मोडीवर पडून तसे दप्तर तयार झाले. अर्थात महाराष्ट्रेतर त्यावरल वाच्यता करीत नसले तरी गुजराती कानडी, हिंदी, राजस्थानी भाषांतून मोडी कागद, ऐतिहासिक पत्रे आढळतात. त्यातून दडलेला खजिना उघडायला 'मोडी' लिपीची किल्लीच हवी. अशा इतिहासातून त्या त्या काळातील स्त्री जीवन परिस्थिती, राजकीय - सांस्कृतिक व सामाजिक स्थितीही कळून स्त्री अभ्यासकांस उपयुक्त इतिहास कळून त्यावर प्रकाश टाकता येईल.

१. 'महाराष्ट्र : इतिहास आणि संस्कृती पर्यालोचन' - भा.इ.सं.म. पुणे, १९९५

प्रस्तुत ग्रंथ विशेष उल्लेखनीय वाटतो. अंकात ३८ लेख असून त्यात १) अधिकारी व्यक्तींचे तसेच २) नवोदितांचे अभ्यसनीय लेख आहेत. लेखागणिक विषयही अनेकविध परंतु इतिहास संस्कृतीचा मेळ घालणारे आहेत. विविध घटनांवर प्रकाश टाकणारी छायाचित्रेही आहेत. अशा या वाचनीय अभ्यसनीय ग्रंथातील एक उदाहरण पुढे उल्लेखित आहे.

'डेन्मार्क येथील संग्रहालयातील मोडी कागद, ग्रंथ परिचय' - डॉ. म.रा.कुलकर्णी

सदर लेखातून 'डच - इंग्रज व तंजावर' संदर्भातील दुर्मिळ माहिती वाचनात आली. इतकेच नव्हे तर सोबत मोडी पत्र - देखणे, सुवाच्य तसेच सुवर्णपर्णांची वेलबुट्टी ल्यालेले (वर्णनावरून कळते) मनात भरले.

अशा या वाचनीय अभ्यसनीय मोडी पत्राचा अभ्यासकांनी जरूर शोध घ्यावा.

अभ्यासवर्ग सुरू होऊन दहा वर्षे अधिक काळ लोटला. केवळ अक्षर ओळखीने भागणार नसून पुढील (उपरोक्त उदा. प्रमाणे) इतिहास संशोधन करणारास अधिक पुराभिलेख ग्रंथांचा सराव करणे अत्यावश्यक आहे.

सदर मोडी अभ्यासाने विद्यापीठ स्तरावर ही लक्ष केंद्रित करणे अत्यंत जरूरीचे आहे. पुणे विद्यापीठाने ते अगोदरच (१९८४) अवलंबिले असल्याचे 'मोडी लिपी परिचय व ऐतिहासिक पत्रे' वरून कळून येते.

तथापि, अन्य विद्यापीठांनीही मुंबई विद्यापीठ, तसेच महिला विद्यापीठ, कोल्हापूर विद्यापीठ इ. उच्च विद्यापीठांनी येथे लक्ष पुरवावे. तसेच महाराष्ट्रातील इतिहास संशोधन संस्थांनी ही अधिक जोराने प्रयत्न करावा, जेणेकरून कोट्यवधी जनतेचे अभ्यासकांचे कोट्यावधी कागदपत्रांकडे - लक्ष वेधले जाईल, दखल घेतली जाईल.

**सांस्कृतिक महत्त्व :-**

आधुनिक काळी 'मोडी लिपी'स असलेले

सांस्कृतिक महत्त्व दुर्लक्षून चालणार नाही. एकेकाळी राजमान्य असलेल्या पण दुर्दैवाने दुष्ट फेऱ्यात सापडलेल्या या लिपीस सांप्रत पुनश्च सौख्याचा काल येत असल्याचे पाहून तिचे 'वळण-सौंदर्य' याकडे अभ्यासकांचे जिज्ञासूंचे, कलावंतांचे लक्ष वेधू इच्छिते.

'मोडी लिपीचे वळण-सौंदर्य तिच्या अक्षरांच्या अणीदार सरपट - गाठात, डाव्या-उजव्या उजुवारीत तसेच कमळाच्या पाकळीसारख्या असलेल्या चिरणात व बेलांटीच्या कमानीत नि बव्हंशी अपवादभूत अक्षरातच लपेटलेले आहे. हे झाले बाळबोध मत. तथापि, वळणातील गोलवा व गोलव्याची गोडी यामुळे लेखनास प्राप्त झालेली देखणी गती, लेखणीची लय विशेषत: बोरू व तत्सम रुंद पात्याच्या साधनाने वळविलेली अक्षरेच कोणत्याही स्थळी कोणत्याही काळी सौंदर्याचा सांस्कृतिक मिलाफ घडवून आणण्यास समर्थ असल्याचे भारतीय ख्यातनाम लिपितज्ज्ञ श्री र.कृ.जोशी यांचे प्रामाणिक मत आहे.

अशा या वळणदार अक्षरांच्या सरावासाठी -

१०. कानविंदे - कुलकर्णी मोडी अक्षर व टिका परिज्ञान, आ. २ री. १८८३. (रत्नागिरी, पृ. ४५)

हे पुस्तक बहुमोलाचे आहे. अलिकडे देवनागरीत मोडीची वळणे घुसडण्याचा प्रयत्न अनाठायी वाटतो. तिच्या सौंदर्याचा झोकदार हा तिच्या लिपीचा अस्मितेचा मानबिंदू ठरावा.

**सुनीता गणपुले**
विकास कॉम्प्लेक्स,
ठाणे (प.) - ४०० ६०१.
दूरध्वनी : २५४७ ०५८९

॥ श्री राम ॥

श्री. रा.रा. संपादक महाशय,
दिशा मासिक,
ठाणे,

स.न.वि.वि.

दिशा या आपल्या मासिकाचा अंक वाचण्यात आला. त्यातील आशा भिडे यांचा भगवद्गीतेवरील प्रवचनही वाचण्यात आले. भगवद्गीता हा हिंदुधर्माचा पवित्र ग्रंथ. लहानं पण महान असा. तो संस्कृतात असल्याने सामान्यांना समजणे कठीण म्हणून श्री ज्ञानेश्वरादी संतांनी तो मराठीत आणला. विनोबा भाव्यांनी तर समश्लोकी गीताई लिहून मराठीत शब्दबद्ध केला. गीता प्रवचनातून गद्यात सोपा करून सांगितला. गीतेवर अनेकांनी लेखन प्रवचने करून तिचे विवरण केले. सध्या आपल्या मासिकात आशा भिडे यांची भगवद्गीतेवरील लेखमाला प्रसिद्ध होत आहे.

त्या स्वत: मराठीच्या एम्.ए. पदवीधर आहेत तरी आपण मोठे विद्वान असल्याचा आव न आणता सर्व सामान्यांना, स्त्रियांना, मुलांनाही ती समजावी म्हणून अतिशय सोप्या पण प्रासादिक भाषेत तिचे विवरण करीत आहेत. मोठमोठे अवघड शब्द नाहीत, अवतरणं नाहीत तर साध्या शब्दात तिची थोरवी सामान्य घराघरापर्यंत पोचवीत आहेत. त्यांच्या या प्रवचनांचा अनेक भगिनींनी भरभरून रसास्वाद घेतला. आता ती लेखरूपाने प्रसिद्ध होत आहे. त्यांचे हार्दिक अभिनंदन. ती पुस्तकरूपाने प्रसिद्ध होवोत. त्यांच्यातून अशाच थोर संस्कार प्रेरणा समाजाला लाभो, ही सदिच्छा!

**उषा लिमये**
५०७, बीज मंडळ वसाहत,
आर-१०, वांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,
वांद्रा (पूर्व).

# मोडी लिपीची माहिती व महती

*मोडी लिपीसंबंधात आमचे जुने स्नेही श्री. ल. टिळक यांचाही लेख अचानकच आला. सौ. गणपुले मॅडमचा व हा लेख एकत्रित अभ्यासकांना उपलब्ध व्हावेत म्हणून याच अंकात हा लेख देत आहोत. - संपादक*

१९९० च्या सुमारास जागतिक मराठी परिषद स्थापन होऊन, परिषदेचा एक उपक्रम म्हणून मा. शरद पवार व मा. माधवराव गडकरी यांच्या सुचनेप्रमाणे १८ जानेवारी १९९१ रोजी 'मोडी लिपी शिक्षण प्रसारक मंडळा'ची स्थापना झाली. म्हणून '१८ जानेवारी'चा दिवस हा 'मोडी लिपी प्रसार दिन' म्हणून या प्रसारक मंडळातर्फे साजरा होत असतो.

मोडी लिपीचा जनक कोण? या प्रश्नाचे निश्चित उत्तर अजून ज्ञात नाही. परंतु यादवांचा पंतप्रधान हेमाडपंत याने मोडी लिपीला चांगले स्वरुप दिल्याने, या संदर्भात त्याचे नाव विशेषत्वाने घेतले जाते. त्याने या लिपीला राजलिपीचा दर्जा दिल्याने या लिपीचा झपाट्याने प्रचार झाला. ही लिपी राज्यव्यवहारात तसेच घरगुती पत्रव्यवहारात चांगले मूळ धरून होती. तसेच - कोर्टखटले / निवाडे, महसूल, भूसंपादन विभागाचे कागदपत्र, कर्जरोखे, दानपत्रे, मृत्युपत्रे असे बरेच कागदपत्र अजूनही घरोघरी लिप्यंतराशिवाय पडून आहेत व अशा कागदपत्रात 'दडलंय' काय हे समजून घेण्यास अशा व्यक्ती उत्सुक आहेत.

ज्यांच्याजवळ असे कागद नाहीत त्यांना मात्र अनेक प्रश्नांनी भंडावून सोडल्याचे आढळते. त्यांचे प्रश्न असे आहेत १) मोडी शिकणे ही सर्वकालिन गरज आहे का? २) मोडी शिकणे/ शिकविणे अनुत्पादक कर्म नाही का? ३) मोडी लिपीत भरभर लिहिता येते, हा मुद्दा 'शॉर्ट हँड'च्या पर्यायामुळे गौण नाही का? ४) मोडीतील लेखन व्याकरण शुद्ध कुठे असते ? ५) मोडी लिपीत लिहिलेले संत वाङ्मय का नाही ? ६) मोडी लिपीचा अन्य भाषांमध्ये वापर का नाही? असे अनेक प्रश्न आहेत व अशा प्रश्नांना उत्तरे देणे अवघड नाही. परंतु 'मोडी लिपी प्रचार दिना'च्या सुदिनी चर्चा, वाद-विवादापेक्षा मोडी लिपी शिकण्यात नेमकी काय गोडी आहे हे सांगणे व त्याद्वारे शिक्षणासाठी आबालवृद्धांना प्रेरणा देणे हे अधिक स्तुत्य ठरेल.

मराठी चौथीत (इ.स. १९४३-४४ मध्ये) 'इतिश्री' झालेल्या माझ्या मोडीलिपीची पुन्हा 'अथश्री' झाली १९९९ मध्ये (म्हणजे तब्बल ५५ वर्षांनी) मोडी-शिक्षण निपुण श्री. मनोहर जागुष्टे यांचा मोडी लिपीचा ठाणे येथील वर्ग चालू झाल्यावर ! वयाच्या ६७ व्या वर्षी !! हा वर्ग पूर्ण करून मी परीक्षेला तरी बसेन की नाही याबद्दल माझ्याच मनात शंका होती. परंतु जागुष्टे गुरुजींच्या वर्गाचा एक-एक रविवार म्हणजे 'कसे शिकवावे व कसे शिकावे याचा आदर्शच ठरला. मी चांगले गुण मिळवून 'प्राथमिक' व 'प्रगत' दोनही परीक्षा उत्तीर्ण झालो.

मोडीची गोडी लागण्याचे एक कारण शास्त्रशुद्ध शिक्षण होते. तसे दुसरे कारण या लिपीच्या माध्यमातून जेजे वाचावयास मिळू लागले त्या वाचनात आनंददायी गोडी होती. कशी? त्याची एक-दोन उदाहरणेच सांगतो.

आपण पत्रलेखनातील 'श्री'पासूनच सुरुवात करू. याला श्रीकार म्हणत व तो क्षेम कुशलाचा निर्देशकही ठरे. विशेष म्हणजे, श्रीच्या पुढे १ ते ६ आकडे टाकून हे पत्र कोणासाठी आहे हेही स्पष्ट केले जात असे. जसे - श्री ॥१ म्हणजे भार्या, पुत्र श्री ॥२, सेवक श्री ॥३, मित्र श्री ॥४, शत्रू श्री ॥५, स्वामी श्री ॥६ गुरु यांच्यासाठी.

मोडक आडनावाच्या कुटुंबातील मोडीलिपीतील दानपत्रात मला श्रीकाराचा एक वेगळाच उपयोग आढळला. कागदपत्रात असे लिहिले होते की, 'सदरहू दस्तऐवजात श्रीकारापासून नववे ओळीत 'अजमासे' अक्षराखाली रेघ मारून इनिशियल केली आहे.' त्यामुळे नेमकी ओळ शोधणे सोपे झाले.

भिडे कुटुंबातील मोडी कागदपत्रातील 'दरसाल वीस रुपये बऱ्याच अंशी पुरतात' हे १९०७ सालचे विधान २००२ साली, लिप्यांतर करून वाचल्यावर आर्थिक स्थितीचे स्थित्यंतर प्रकर्षाने जाणवले.

संवत्सरे, सुहूरसन इत्यादी कालगणना, भानुवासर, इंदुवासर इत्यादी वारांची नावे, रेघी हिशेब हे सर्व मोडी लिपी शिकताना कळते. एवढेच काय - मराठी, संस्कृत,प्राकृत, फारसी, अरबी शब्दांचे ज्ञानसुद्धा ओघानेच प्राप्त होते.

एका कागदपत्रात उल्लेख होता - 'बक्षीस पत्र लिहून देणार राधाबाई कोम विष्णु गुरव, धंदा घरकाम करणेचा' - 'कोम' हा अरबी शब्द - अर्थ पाहिला तेव्हा कळले की 'भ्रतार' या संस्कृत शब्दांऐवजी हा शब्द वापरला आहे.

'अनंतभट बिन गोपाळभट' म्हणजे गोपाळभटांचा पुत्र अनंतभट असे कळले तेव्हा लिप्यांतर अर्थपूर्ण होते.

सरकार दरबारच्या कागदपत्रांचे मायनेच किती तालबद्ध असतात, ते मोडीलिपीच्या वाचकालाच वाचावयास मिळतात.

'राजश्रियांविराजित राजमान्यराजश्री बाळाजी जनार्दन स्वामी गोसावी यांसी पोष्य माधवराव नारायण प्रधान नमस्कार. विनंती. उपरी. येथील कुशल जाणोन स्वक्रिये कुशल लिहित जाणे. विशेष.'

अशा या गोडी निर्माण करणाऱ्या मोडीबद्दल, म्हणूनच मा. राधाकृष्ण नार्वेकर यांनी एका लेखात म्हटले आहे. 'जागुष्ट्यांच्या प्रयत्नांना आपण सर्वांनीच मोठ्या प्रमाणावर सक्रीय पाठिंबा देण्याची आवश्यकता आहेच परंतु सरकारनेही मोडीच्या वर्गांना आर्थिक अनुदान देऊन या चळवळीमागे स्वतःची ताकद उभी करण्याची आवश्यकता आहे. तसे झाले तर मोडी वाचवण्याची आणि मोडी प्रसाराची ही चळवळ महाराष्ट्रातील निदान काही शहरात तरी निश्चितपणे पोहोचेल. यातून अधिक शिक्षक, अधिक कार्यकर्ते तयार होतील. मोडीचा अधिकाधिक प्रसार होईल आणि त्यातून मराठी तरुणांच्या ठिकाणी आपल्या पूर्वजांचा इतिहास जाणून घेण्याची उर्मी निश्चितच निर्माण होईल यात शंका नाही.'

मा. राधाकृष्ण नार्वेकर यांचे हे मननीय विचार कृतीत आणण्याचा संकल्प या दिनी वाचकांनी करावा - म्हणजे सिद्धीस जाण्यास वेळ लागणार नाही.

**श्रीकृष्ण लक्ष्मण टिळक**
सोनल अपार्टमेंट, अग्यारी लेन,
जांभळी नाका, ठाणे - ४०० ६०१.

## महत्त्वाची टीप

*मोडी शिकणे अगर मोडी दस्तऐवज वाचणे यासाठी ज्यांना सहाय्य हवे आहे, अशांनी*

| | |
|---|---|
| *मनोहर जागुष्टे* | *२५८२ २८४६* |
| *कृष्णाजी म्हात्रे* | *२५११ ९८९६* |
| *श्री. ल. टिळक* | *२५४१ ०८०५* |

*येथे संपर्क साधावा.*

# सावधान ! कारखाने बंद पडत आहेत

*ठाण्यातील श्री समर्थ सेवक मंडळाच्या कै. गी. गो. पंडितराव वक्तृत्व स्पर्धेतील भाषणे ही आमच्या विद्यार्थ्यांच्या विचार करण्याच्या क्षमतांचे आयाम स्पष्ट करतात. त्या दृष्टीने प्रति वर्षी काही उल्लेखनीय भाषणे आम्ही स्पर्धा समितीच्या सहकार्याने 'दिशा'च्या वाचकांसमोर ठेवत असतो. - संपादक*

त्या दिवशीची ती सकाळ. वर्तमानपत्र हातात घेतले, तोच नजर त्या बातमीकडे गेली. ठाणे जिल्ह्यातील वागळे इंडस्ट्रियल इस्टेट परिसरातील अनेक उद्योग बंद आहेत. चालू कारखान्यांपैकी अनेक बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. पण ही गोष्ट काही वागळे इस्टेट परिसरापुरती मर्यादित नाही. आज सर्वत्र हीच परिस्थिती आढळते. अनेकांनी मेहनतीने उभारलेले आणि अनेकांच्या पोटापाण्याचा प्रश्न सोडवणारे कारखाने बंद पडत आहेत. उद्योगक्षेत्रातील या घडामोडींमुळे एकूणच आर्थिक व सामाजिक व्यवस्थेवर ताण निर्माण होत आहे पण हे असे का घडत आहे?

कारखाने बंद पडण्यामागे तशी अनेक कारणे आहेत. भारतातील अनेक कारखाने परंपरागत पद्धतीने उत्पादन करतात, त्यामुळे सहाजिकच उत्पादनक्षमता कमी आणि खर्च अधिक अशी परिस्थिती निर्माण होते. अशावेळी वस्तूंची किंमत इतरांच्या तुलनेत अधिक ठरते. त्यामुळे बाजारात या वस्तुंचा खप कमी असतो. अनेक वेळा केलेले निकृष्ट दर्जाचे उत्पादन वस्तूंची मागणी कमी करते. खुल्या अर्थव्यवस्थेमुळे परदेशी कंपन्यांना बाजारपेठेत प्रवेश करणे शक्य झाले आहे. आधुनिक तंत्रज्ञानामुळे अशा कारखान्यांची उत्पादन क्षमता आणि गुणवत्ता अधिक ठरली. स्वदेशी उद्योग अशा परकीय उद्योगांच्या तुलनेत कमी पडत आहेत. सहाजिकच स्वदेशी मालाचा उठाव कमी झाला. समाजाची मानसिकता हे आणखी एक कारण. आज आम्हांला परदेशात तयार परदेशात तयार केलेल्या वस्तूंचे अधिक आकर्षण वाटते. 'Made in China' किंवा 'Made in America' अशी लेबले लावली की आमच्या नजरेत त्या वस्तूचा दर्जा फारच अधिक असतो. 'Made in India' म्हणून मिरवणारी 'Chinese' वस्तू आम्हाला आवडणार नाही. पण 'Made in China' म्हणून लेबल असलेली भारतीय वस्तू आम्ही लगेच स्वीकारतो. परदेशी वस्तू वापरणे प्रतिष्ठेचे मानले जात आहे. यामुळे स्वदेशी उत्पादनांची मागणी घटली. मागणीच्या अभावामुळे सहाजिकच कारखान्यांवर परिणाम होत आहे.

पण मागणीचा अभाव हे कारखाने बंद पडण्याच्या प्रक्रियेतील एकमेव कारण नाही. बऱ्याचवेळा उद्योगक्षेत्रात शिरलेले गलिच्छ राजकारण सुद्धा यास कारणीभूत ठरते. क्षणिक मोहापायी मालकवर्ग स्वत:च्याच उद्योगास टाळेबंदी करण्यास धजावत आहेत. कारखान्यांच्या जागेत गृहसंकुल उभारण्याचा घाट घातले जात आहेत. तर काही वेळा या जागांच्या विक्रीतून उपलब्ध होणारा पैसा खुणावत आहे. या स्वार्थापोटी नफ्यात असलेले कारखानेसुद्धा तोट्यात दाखवून नंतर बंद पाडले जात आहेत. अगदी अलीकडे संमत झालेल्या कायद्यानुसार कोणतीही पूर्वसूचना न देता कामगार कपात करणे किंवा टाळेबंदी करणे मालकवर्गास शक्य आहे. पण अनेकवेळा कामगार नेतेसुद्धा या कामगार विरोधी कटात सामील असतात. तर काही वेळा कामगार नेत्यांच्या असहकाराच्या धोरणामुळे कारखान्यांच्या अस्तित्वापुढे प्रश्नचिन्ह निर्माण होते. कारखाना तोट्यात असताना कामगारांनी पगारवाढ, बोनस इत्यादीसाठी केलेले संप, निदर्शने यामुळे कारखान्याची स्थिती अधिक बिकट होते. महाराष्ट्रातील अनेक कापड

गिरण्या याच प्रकारामुळे बंद कराव्या लागल्या. एकाच कारखान्यात एकाहून अधिक कामगार गट कार्यरत असल्याने कामगारांत एकजूट होऊ शकत नाही. कामगारांच्या परस्परांतील वैमनस्यामुळे कारखान्यावर परिणाम होऊ शकतो. काही वेळा नैसर्गिक आपत्तीमुळे कारखान्यांवर परिणाम होतो. अशा तऱ्हेने उद्योग बंद पडल्यानंतर अनेक कामगारांवर उपासमारीची वेळ आली आहे. तर काही वेळा शासकीय नियम व अटी उद्योगास पोषक नसल्याने कारखाने इतरत्र स्थलांतरित केले जात आहेत.

आज उच्च विद्याविभूषित उमेदवारांची संख्या वाढली आहे. अशा उमेदवारांचा कल हा प्रामुख्याने सेवाक्षेत्रातील संधीकडे असतो. त्यामुळे कारखान्यात श्रमाची कामे करण्यास फारसा कुशल कामगार उपलब्ध होऊ शकत नाही. आजच्या आधुनिक युगात सुद्धा भारतातील अनेक कारखाने परंपरागत पद्धतीवर भर देतात. काही वेळा उद्योग उभारणी आधीची प्रक्रिया लालफितीच्या कारभारात अडकून पडल्यामुळे बरेचसे भांडवल खर्ची पडते. अशावेळी प्रत्यक्ष उद्योग उभारणीच्यावेळी आधुनिक सोयी-सुविधांची सोय करता येत नाही. अशातच कुशल कामगारांच्या अभावतेमुळे मालाच्या गुणवत्तेवर परिणाम होतो. कारखाना चालू ठेवण्यात अनेक अडचणी येऊ शकतात. त्यामुळे एकीकडे उमेदवारांना जागा नाही तर दुसरीकडे जागेसाठी उमेदवार नाहीत अशी द्विधा परिस्थिती निर्माण झाली आहे. जागतिकीकरणाच्या वाटेवर स्वार होताना खाजगीकरणाची प्रक्रिया वेग घेत आहे. आरामदायी वाटणारी शासकीय सेवा तशी उरलेली नाही. अनेक शासकीय उपक्रमांचे खाजगीकरण केले जात आहे. खाजगी कारखान्यात प्रामुख्याने तंत्रज्ञानाचा वापर केला जाऊ लागला आहे. पूर्वी जिथे १०० कामगार काम करीत होते तेथे एकच कामगार यंत्राच्या साहाय्याने काम करत आहे. सहाजिकच रोजगाराची संधी घटली आहे.

'नोकरी नाही तर उद्योग उभारा' असा एक गोड सल्ला आज दिला जातो. पण प्रत्येकवेळी हे शक्य असतेच असे नाही. प्रत्येक तरुणास वडिलोपार्जित संपत्तीचा वारस असेलच असे नाही. महागड्या शिक्षणामुळे मध्यमवर्गीयांची बचत केवळ शिक्षणापुरतीच असते. उद्योगास आवश्यक असलेल्या भांडवलीसाठी अशावेळी नोकरीशिवाय पर्याय उरत नाही. पण अनुभवाशिवाय नोकरी देण्यास कुणीही राजी नसतो. प्रत्येकास अनुभवी कारागीर हवा असतो, मात्र कारागीरास अनुभव देण्याची कुणाचीही तयारी नसते. या चक्रात सापडलेल्या अनेक उच्चशिक्षित उमेदवारांना देखील दोन ते तीन हजार रुपयांच्या तुटपुंज्या पगारावर समाधान मानावे लागते. यामुळे भांडवल उभारणे शक्य नसते किंवा असलेच तरी एवढ्या प्रयत्नांनंतर मिळालेली नोकरी सोडून रोजगाराची संधी अजमावून पाहण्याची मानसिक तयारी नसते.

आज कारखाने बंद पडत असल्याने अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. देशाच्या अर्थव्यवस्थेवर ताण पडत आहे. जागतिक पातळीवर रुपयाचे अवमूल्यन होत आहे. वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होऊ शकत नसल्याने बेकारी वाढली आहे. परिणामी गरिबी वाढली. रिकामे मन हे सैतानाचे घर. हाताला काम नाही, पण भूकेची जाणीव असल्याने बेकार तरुण गुन्हेगारी क्षेत्राकडे वळू लागले आहेत. खून, दरोडे, अपहरण, खंडणी इत्यादी गुन्ह्यांचे प्रमाण वाढले. समाजात असुरक्षितता वाढली. श्रीमंत वर्ग अधिक श्रीमंत होत आहे तर गरीब अधिकच पिळला जात आहे. यातून सामाजिक विषमता निर्माण झाली. समाजाच्या दोन घटकातील दरी वाढली. बेकार तरुणांची मने भडकवून त्यांना समाजविघातक कारवायांकडे वळवले जात आहे. त्यामुळे देशाच्या अंतर्गत सुरक्षेवर अतिरिक्त ताण पडत आहे. आर्थिक वंचनेत असलेल्या कुटुंबातील मुलांना पुरेसे शिक्षण नाही. अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजासुद्धा अनेक वेळा पूर्ण होऊ

शकत नाही. आरोग्य सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे देशाच्या उगवत्या पिढीचे भविष्य धोक्यात आले आहे. एकूणच देशाच्या भावी विकासापुढे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

देशाची आर्थिक आणि सामाजिक व्यवस्था धोक्यात आणणाऱ्या या संकटावर उपाययोजना करणे आवश्यक ठरते. सामाजात श्रमप्रधान भावना वाढीस लावली पाहिजे. उद्योग उभारणीस अधिक प्रोत्साहन देऊन एकूण प्रक्रिया सुलभ व्हायला हवी. आजारी उद्योग पुन्हा भरभराटीस येण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. उत्पादन प्रक्रियेत आधुनिकता आणण्याची गरज आहे. जागतिकीकरणाला सामोरे जाताना वस्तुची गुणवत्ता टिकवायला हवी. शासकीय पातळीवर अधिक प्रयत्न व्हायला हवेत. यासाठी नवीन उपाययोजना आणि सवलती जाहीर करण्याची गरज नाही, तर आहेत त्याच तरतुदी कार्यक्षम करणे गरजेचे आहे. राजकीय इच्छाशक्तीच देशाला या संकटातून बाहेर काढू शकते. ''सावधान ! कारखाने बंद पडत आहेत !'' ही धोक्याची सूचना इतिहासजमा होऊ शकते.

सृष्टी शिवानंद अंकोलेकर
(पदवी गट)
१२/३७८, एम्. एच्.बी. कॉलनी,
वर्तक नगर, ठाणे - ६.

श्री. रा.रा. संपादक महाशय,
दिशा मासिक,
ठाणे.

स.न.वि.वि.

सहज एकाच्या घरी 'दिशा' मासिक पाहिले. यापूर्वी या मासिकाबद्दल काहीच माहिती नव्हती. मराठीत एका नव्या मासिकाची भर पडलेली पाहून आनंद वाटला. अभिनंदन !

एकूण मासिकाचं अंतरंगही अभ्यासपूर्ण वैचारिक लेख, विधायक विचार यामुळे आवडले. आशा भिडे यांच्या गीतेवरील लेखमाला वाचून 'दिशा' स्पष्ट झाल्या. या सोप्या भाषेत भगवद्गीता समाजाच्या तळागाळापर्यंत पोचवण्याचं कार्य ही लेखमाला जरूर करेल, अशी आशा वाटते. आपल्या मासिकाला शुभेच्छा.

सौ. गीता पाटील
१०२, विक्रांत अपार्टमेंटस्,
स्वस्तिक पार्कजवळ,
चेंबूर.

दिशा
नियमित वाचा

आपली मते जाणून घेण्यास
आम्ही उत्सुक आहोत.
संपादक

दि
शा
वार्षिक वर्गणी रु. २५०/-
या अंकातील फॉर्म भरून
पाठवा व वर्गणीदार व्हा.

# मराठी लिहायला हवं... बोलायला हवं

'उच्च माध्यमिक स्तरावर मराठी ऐवजी IT चा पर्याय.' अशी पेपरात ठळक अक्षरात बातमी छापून आली. ती वाचली आणि क्षणभर वाटलं की आपण महाराष्ट्रातच आहोत ना? महाराष्ट्रात राहून हद्पार ? जागतिक मराठी परिषद भरवणारे आपणच ना? भाषावर प्रांतरचना करण्यासाठी पुढाकार घेणारे आपणच ना?

२१ वे शतक हे विविध शोधांचे, संगणकाचे, अण्वस्त्राचे, अंधश्रद्धा निर्मूलनाचे तसेच ते पाश्चिमात्यांच्या अंधानुकरणाचे, बहकणाऱ्या, भरकटणाऱ्या तरुणांचे, बेकारीचे, व्यसनाधीनतेचे, चित्रपटांच्या वाढत्या प्रभावाचे 'चलो अमेरिका' या घोषणेचे सुद्धा!

आज प्रत्येक भारतीयाचेच नव्हे तर प्रत्येक मराठी माणसाचे सुद्धा 'अमेरिकेला जाणं' हे जणू एक स्वप्नच बनलं आहे. मग त्यासाठी 'GRE' ची परीक्षा देणे. एखादी परकीय भाषा आत्मसात करणे हेही ओघानं आलच की!

तेथे गणपती, मोदक गेले, तसेच लावण्याही गेल्या, 'वऱ्हाड निघालयं लंडनला' हेही जाऊन आलं. या साऱ्याचा आनंद आम्हा मराठी माणसाला आहे, पण आता मराठी माणसाचं मनही तिकडे धाव घेतयं याची मात्र खंत वाटते, असं व्हायला नको! असं का?

''ने मजसी ने, परत मातृभूमीला
सागरा प्राण तळमळला ॥''

अशाप्रकारे मातृभूमीच्या स्वातंत्र्याच्या ओढीने तळमळणारे सावरकर, टिळक, आगरकर लोकहितवादी यासारखे समाजसुधारक, 'अमेरिकेतील माझ्या बंधुनो व माझ्या भगिनींनो' असे संबोधून अमेरिकेतील लोकांची मने जिंकून घेणारे स्वामी विवेकानंद, आझाद हिंद सेनेचे सुभाषचंद्र बोस, महाराष्ट्राची अस्मिता जागे करणारे छत्रपती शिवाजी महाराज, तसेच कलांना उत्तेजन देणारे व स्वाभिमान जागवणारे शाहू महाराज अशी उज्ज्वल परंपरा लाभली असताना देखील मराठीला दूर लोटायचं?

ते मराठी मन गेलं कुठे? अरे, सरकारचं डोकं ठिकाणावर आहे काय? असा प्रश्न विचारण्याची वेळ पुन्हा एकदा आली आहे.

''*माझा मराठीची बोलु कौतुके ।*
*परी अमृतातेही पैजा जिंके ॥*''

अशाप्रकारे मराठीचे श्रेष्ठत्व आत्मविश्वासाने सांगणारे संत ज्ञानेश्वर, संत वाङ्मय, शाहिरी वाङ्मय केशवसुत व बालकवी इत्यादी अर्वाचीन कवी तसेच मर्ढेकर व पाडगावकर इत्यादी आधुनिक कवी पु. ल. देशपांडे, अत्रे, खांडेकर यासारखे प्रसिद्ध लेखक, कथा, कादंबरी, काव्य, दलित साहित्य इ. वाङ्मयप्रकार इतकं मराठीचं दालन समृद्ध असताना सरकार मराठीला हरवू पाहत आहे?

मराठीच्या ज्ञानसागरात डुंबायचं म्हटलं तर, एक जन्महीं पुरणार नाही. एवढी अफाट ग्रंथसंपदा लाभली असताना, समाजकारण, अर्थकारण, धर्मकारण, राजकारण, अगदी विज्ञानसुद्धा मराठीतच. केवळ काळाचा महिमा म्हणून मराठीचं उच्चाटन हे अजिबात चालणार नाही. मराठीचे अस्तित्व हा तुम्हा आम्हा सर्वांच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे.

इंग्रज जाऊन ५५ वर्षे झाली. जाता-जाता ते आपली संस्कृतीची बीजे भारतीय भूमीत पेरून गेले. त्या संस्कृतीचा पगडा अजूनही आपणावर दिसून येतो.

मुलांचे पालक मुलांना इंग्रजी माध्यमात दाखल करतात. असं का? तर म्हणे मुले 'स्मार्ट' बनतात. पण घरात मराठी बोलतात व शाळेत इंग्रजी बोलतात. मग मुलांना धड मराठीही येत नाही व इंग्रजीही येत नाही. हं, हं, असं किंवा 'मी बाजारात गेली', असं मराठी बोलतात. व्याकरणाचा तर पत्ताच नसतो.

आपण मराठीत म्हणतो, 'ये रे ये रे पावसा.', तर इंग्रजी शाळेत शिकवतात, 'Rain Rain go away' म्हणजे किती विरोधी? मुलांना Cow म्हणजे गाय हे माहीत

असतं पण काऊ ये, चिऊ ये हे मात्र मुलांना माहीत नसते. एकदा अजितला 'परवानगी' हा शब्द लिहायचा होता. त्याने वा वर अनुस्वार देऊन 'परवांगी' हा शब्द लिहून शेतातील वांगी मागवली.

म्हणूनच दादासाहेब रेगे आग्रहाने आग्रहाने सांगतात की मातृभाषेतूनच शिक्षण हवे. कारण आपण विचार मराठीत करतो आणि मराठीतच ते चांगल्याप्रकारे मांडू शकतो.

हल्ली परप्रांतीयाचे लोंढे महाराष्ट्रात सतत येत असल्याने इतर भाषिकांत वावरताना आपण त्यांचीच म्हणजे मुख्यत्वेकरून हिंदी भाषा उचलू लागलो आहोत म्हणूनच मराठीवर हिंदीचे आक्रमण झाले. दोन मराठी माणसे हिंदी बोलताना दिसतात.

चित्रपटांचा, दूरदर्शन व वाहिन्यांच्या वाढत्या प्रभावामुळे चित्रपटातील हिडीस नृत्ये, त्यावरील केशभुषा, वेशभूषा यांचे तंतोतंत अनुकरण तसेच पाश्चिमात्यांचे अनुकरण यामुळे मराठी माणूस आपली संस्कृती विसरू लागला आहे.

मराठीचं असं उच्चाटन केलं तर कसं होईल? म्हणून मराठीतूनच बोलायला हवं, मराठीचं महत्व समजून घ्यायला हवं व मराठीचा मान राखायला हवा.

आपल्या आईला कोणी दोष दिला, नावे ठेवली तर जसं आपण रागाने उफाळून येतो, तसाच मान आपल्या मायबोलीला द्यायला हवा. मायबोलीचं हे प्रेम जेव्हा मनात रुजेल तेव्हाच ते वाणीतून प्रकट होईल.

आपण सारे स्पर्धेच्या युगाचे वारकरी झालो आहोत. म्हणून आपल्या संस्कृतीला दूर लोटून अमेरिकेची संस्कृती ही आपली संस्कृती आहे, असं म्हणू लागलो आहे. प्रगत ज्ञान, इतर देशातील विकसित तंत्रज्ञान जाणून घेण्याच्या दृष्टीने इंग्रजी यायलाच हवं. हे जरी निर्विवाद असलं तरी शेवटी आई प्रथम. आपण पाहिलं तर आपले आजी-आजोबा इंग्रजीतून शिकले तरी ते किती शुद्ध व परिणामकारक इंग्रजी बोलू शकतात म्हणून इंग्रजीचे महत्त्व मानायचे पण प्रथम मायबोलीचे रक्षण करायचे.

स्वातंत्र्यदेवीची विनवनी या कवितेत कवी म्हणतात -

''परभाषेतही व्हा पारंगत, ज्ञानसाधना करा तरी।
माय मराठी मरते इकडे, परकीचे पद चेपू नका ॥

मराठी संस्कृतीने दिलेलं विचारांचं, आचारांचं व मूल्यांचं धन पुढील पिढीला देण्याची जबाबदारी मित्रांनो, आता तुमची आमची आहे. म्हणून मराठी लिहायला हवं, बोलायलाही हवं. म्हणूनच ग्रंथ, पाठ्यपुस्तके, वृत्तपत्रे यांचे विशेष महत्व आहे. 'प्रथम विचार मग उक्ती व मग कृती' ही संस्कृतीची त्रिसूत्री आहे.

'जन पळभर म्हणतील हाय-हाय' असे कवी भा.रा. तांबे म्हणतात तर बहिणाबाई म्हणतात की, 'जगणं मरनं एका सासाचं अंतर' अशी कितीतरी जीवनविषयक सत्य मराठीत मांडली आहेत.

भाषा आपल्या जीवनातील विषमता व कुरूपता दूर करून आपले जीवन फुलपाखरासारखे स्वतंत्र, आनंदी व सुखी बनवते. भाषा जीवनात सौंदर्य आणते.

भाषा वैयक्तिक स्तरावर व सामाजिक स्तरावर प्रगती करते. म्हणूनच भाषेविषयी प्रेम जागवायला हवे, जिने एकेकाळी राजवस्त्रे परिधान केली ती आज फाटकं - तुटकं वस्त्र घालून वावरताना पाहून फार वाईट वाटते.

*म्हणूनच मराठीत बोलू,*
*मराठीत चालू,*
*मराठीच वेष आम्ही घालू ॥*
*मराठीचं वळण लावू या मनाला ।*
*मराठीचा महिमा सांगू या जगाला ॥*

**केतन गायकवाड**
कनिष्ठ गट
अकरावी (वाणिज्य),
सोमैया महाविद्यालय,
मुंबई.

# श्रीमद्‌भगवत् गीता (अध्याय १० वा) ।। विभूतियोगः ।।

(सर्व घराघरांसाठी घरातील सर्वांसाठी 'श्रीमद्‌भगवत् गीता' सर्वांना सहज समजेल अशी)

> श्रीमती भिडे यांच्या सदर लेखमालेपासून स्फूर्ती घेऊन अनेकांनी गीतेवर लेख पाठवण्यास सुरुवात केली आहे. गीता ही केवळ वाचण्यासाठी नाही तर आचरण्यासाठी आहे, हा संदेश 'दिशा'तून पोहचत आहे हे महत्वाचे वाटते.
>
> \- संपादक

९ वा अध्याय संपला आहे. म्हणजे गीतेचा पूर्वार्धं संपून आता उत्तरार्धाला सुरुवात होणार आहे. म्हणून मला वाटतं १० व्या अध्यायाला सुरुवात करण्यापूर्वी झालेल्या ९ व्या अध्यायावर धावती नजर टाकावी व सिंहावलोकनानंतर मग दहाव्या अध्यायाला प्रारंभ करावा.

**सिंहावलोकन :-**

अध्याय १ ला अर्जुन विषादाचा. त्याला स्वजनांबद्दल अचानक एकाएकी ममत्व, लोभ, करुणा निर्माण झाली. रक्तलांछित राज्य मला नको. स्वजनांना मारून मला कोणते सुख लाभणार ! त्यापेक्षा भीक मागितलेली बरी वगैरे वगैरे तो बोलत राहतो. 'स्व' शिवाय 'मी' शिवाय दुसरा विचारत त्याला शिवत नाही. पण दुसऱ्यात भगवंताला शरणयेऊन मला कर्तव्य कोण कोणतेच कळत नाही ते मला समजावून सांग. तेव्हा भगवंताने त्याची जरा कान उघाडणी केलीय. 'स्व' सोडून समष्टीचा विचार कर. देहाचा परिघ व्यापक बनव. म्हणून जरा खडसावून बजावले. स्वधर्म कर्तव्य कर्म सर्वांना अटळ आहे, हे सांगून स्थितप्रज्ञाची लक्षणेही अर्जुनाने विचारल्यामुळे सांगितली आहेत. तिसऱ्यात तर अर्जुनाच्या प्रश्नाला उत्तर देताना भगवंत सांगतात की आत्पा व्यापक, निष्काम व अकर्ता आहे. देय असलेल्याला कर्म हे अनिवार्य अटळ आहे. अहंकार व आसक्ती यांचा त्याग करून कर्म करावीत. भगवंताने शेवटी सांख्यवादाचाही (संन्यासाचा) जाता जाता पुरस्कार केलाय म्हणून तिसऱ्याच्या प्रारंभी अर्जुन गोंधळून जाऊन विचारतो, 'मी नक्की काय करु? संन्यास की कर्म?' याचे उत्तरही या अध्यायात भगवंताने दिले आहे. एकमेव असणारा परमात्मा सारे विश्वचक्र चालवतो.तूही आत्मतत्व ज्ञान मिळवून स्वधर्मरूप यज्ञ कर. हा श्रेष्ठतम यज्ञ आहे. ज्ञान म्हणजे एकातमतेचा अनुभव व यज्ञ म्हणजे विविधतेचा विस्तार, हे चौथ्यात सांगितले. पाचव्यात हे ज्ञान ज्यालाहोते त्याला ज्ञानविज्ञान तृप्त म्हणतात. विश्वात ज्ञान विज्ञान ओतप्रत भरले आहे. मला कर्म संन्यास अभिप्रेत नाही मला वृत्तीचा संन्यास हवा. 'आसक्तीचा', 'अहम्'चा संन्यास हवा. तरीपण कर्माचे बाहुले समोर नाचलेच पाहिजे. सहाव्यात ध्यानाने आत्मतत्वाची (अहंकारापलिकडील) अनुभूती येते. ज्ञान-आत्मज्ञान व विज्ञान - विश्वज्ञान हे येथे लक्षात ठेवले पाहिजे. कारण पुढे वारंवार याचा उल्लेख येणार आहे. सातव्यात विश्वाच्या विविधतेत एकच एक परमात्म तत्व भरलेले आहे. ही अनुभूती येण्यासाठी आत्मानुभूतीची प्रथम गरज आहे. परा प्रकृतीने अपरा प्रकृती धारण केली आहे. एकात्मता म्हणजेच परा प्रकृती, अक्षर पुरुष, परमात्म तत्त्व, परम धाम. हे अनुभवण्यासाठी प्रथम आत्मानुभूतीची गरज आहे. यासाठी भक्तीचे चार प्रकार सांगितले आहे. परमात्म्याशी एकरुप होणे, अनन्य होणे म्हणजेच योगी होणे, भक्त होणे. संपूर्ण जीवन हीच योगसाधना बनून जावी, हा आठव्याचा विषय. मृत्यूसमयी माझी आठवण ठेव म्हणजे मला प्राप्त होशील हा संदेश. नववा राजविद्या राजगुह्य योग. ध्यान-तप-साधना यापैकी काहीच जमत नसेल तर सर्वांना जमेल असा सोपा मार्ग सांगतो असे सांगून भगवंत सांगतात की

तू रोज जी काही कर्मे करतोस ती माझ्यासाठी कर, मला अर्पण कर म्हणजे तू जन्ममृत्यूच्या चक्रातून मुक्त होऊन मला प्राप्त होशील. हा राजमार्ग सर्व जाती धर्मांसाठी स्त्रिया, वैश्य, शूद्र सर्वांना खुला आहे हे यात बजावले आहे.

**अध्याय १० वा -**

या सिंहावलोकनानंतर आता अध्याय १० विभूतियोगाला सुरुवात करु या. माझे आतापर्यंतचे उपदेशपर भाषण तू न कंटाळता अगदी जिज्ञासेने, उत्सुकतेने ऐकलेस म्हणून तुझ्या हिताचेच जरा आणखी थोडे सांगतोय ते ग्रहण कर.

हे बघ अर्जुना, मी सर्वांचा आदि असल्यामुळे माझा जन्म केव्हा झाला हे देव ऋषींही जाणत नाहीत आणि जो मला जन्मरहित, अनादि व सर्वेसर्वा म्हणून जाणतो तो मोहरहित व पापमुक्त होतो. बुद्धी, ज्ञान, क्षमा, सत्य, शांती, सुख, दु:ख, इंद्रियनिग्रह, जागृकता, भय, अहिंसा, संतोष, यश, अपयश हे सर्व भाव माझ्यापासूनच उत्पन्न होतात. ज्यांच्यापासून ही प्रजा उत्पन्न झाली ते सात ऋषी व चार मनू (ही अकरा तत्वे) हे सुद्धा माझेच मानस भाव आहेत. जे माझे मानसभाव व योग (त्याची कार्यपद्धती) जाणतात ते मला प्राप्त होतात. विश्वाची 'उत्पत्ती व प्रलय' परमतत्वातच होतो, हे जाणून ज्ञानी परम तत्वाला भजतात.

हे केशवा, तुझे मूळ देव दानवांना सुद्धा कळलेले नाही. फक्त तूच तुला जाणतोस म्हणून जरी तू सर्व विश्वात भरलेला आहेस तरी ज्या विभूतींनी तू या जगात भरून राहिला आहेस त्या सर्व दिव्य विभूती तूच मला सांग ना! कोणा कोणात, कशाकशात, कुठे कुठे मी तुला पहावे, तुझे निरंतर चिंतन करावे, तुला भजावे बरे! अर्जुनाने प्रेमाने घातलेली गळ भगवंताला मान्य करावीच लागली व ठीक आहे माझ्या मुख्य विभूती मी तुला सांगतो. कारण माझ्या विभूती विस्ताराला अंत नाही त्या अनंत आहेत.

(परमात्मा हा निर्गुण निराकार अनंत असा असल्याने तो तसा अगाकलनीयच. विभूती हे परमात्म्याचे प्रगट सुस्पष्ट रूप आहे हे भावनेने मानले की भक्तीही संभवेल. निर्गुण निराकाराचे 'ध्यान' सामान्यांना संभवनीय नाही म्हणून अर्जुनाने भगवंताला हा प्रश्न केला आहे.)

विनोबाजी म्हणतात, ९ व्या अध्यायात सांगितलेला ईश्वरार्पण योग कसा साधावा ते या दहाव्या अध्यायात सांगितलेय. परमेश्वर आधी ठळक, दृष्य गोष्टीत त्याही रोजच्या सहवासातल्या व्यक्तीत पहायला शिका. त्यासाठी ते फार मार्मिक उदाहरण देतात. लहान मुलांना शाळेत प्रथम मोठा 'A' मग छोटा 'a' काढायला शिकवतात. तसेच आधी ठळक मग सूक्ष्म - अदृश्य गोष्टीत परमेश्वर पहायला शिकायचं. आधी विशाल सागरात मग देवात आधी स्थूळात मग सूक्ष्मात. परमेश्वर दर्शनाची बाळबोध रीत म्हणजे मानवातील परमेश्वर माना, जाणा. मातेला देव माना, पित्याला देव माना. गणपतीने मातपित्याला प्रदक्षिणा घालूनच पृथ्वी प्रदक्षिणा पूर्ण केली होती.

'मातृ देवो भव । पितृ देवो भव । आचार्य देवो भव ।'

तसेच 'संत ते देव । देव ते संत' या म्हणण्या-प्रमाणे सर्व साधूसंत देवच आहेत. पण सध्याच्या पिढीच्या डोळ्यावर जडवादाचे भूत आहे. ते देव कुठे आहे? म्हणून विचारतात. मातेतील जवळचा देव त्यांना पटत नाही व दूरचा तेजस्वी (प्रखर) देव त्यांना पेलत नाही, पचत नाही. विश्वरूप दर्शन अर्जुनाला पेललेले नाही म्हणून तो भगवंताला सौम्य रूपात दर्शन दे म्हणतो. तुझ्या विभूती सांग म्हणून विनवतोय. सृष्टीतही चंद्र, सूर्य, डोंगर, दऱ्या, आकाश, समुद्र या विभूतीच तसेच प्राण्यात वानर, गाय, नाग इ. स्थळ काळातही परमेश्वरीय विभूती आहेत. प्रथम राम-कृष्ण यातील विभूती जाणा मग रावण, दुर्योधन, दु:शासन, हिरण्यकश्यपू इ. दुर्जनातीलही जाणा. साध्या 'अ'क्षरात, परमेश्वर तसाच जोडाक्षरात पण.

परमेश्वराने सर्वांना आपली अंशात्मक रूपाने माता

दिलीय. तो एकटा सर्वांकडे कसे लक्ष देणार ? देशाचा कारभार उत्तम चालावा म्हणून मंत्री नेमलेले नसतात का? मातेची व्याप्ती आपण वाढवू -

माता - राष्ट्रमाता - भूमाता - जगन् माता
(विश्वयोनी जगदंबा तोच ज्योतिर्मय परमात्मा, चित्सागर)

'ज्योतिर्मय मूर्ती तुझी ग्रहमंडळ दिव्य प्रभा' तसेच
'हे दिनमणि व्योमराज, भास्कर हे गगनराज
तेजातच जनन मरण तेजातच नवीन साज ॥ परमात्म्याच्या निर्गुण निराकार रुपाला सूर्याच्या तेजस्वितेत पहा चंद्राच्या शीतलतेत पहा, उडू गणांच्या अगणिततेत पहा.

परमेश्वराचा विश्वातील, जड सृष्टीतील प्रगट (दृश्य) अवतार म्हणजे विभूती. चिदेशाचा उत्कट अविष्कार म्हणजे विभूती. मग तो अविष्कार वस्तूत, व्यक्तीत, प्राण्यात, पक्ष्यात, जळात, स्थळात, काळात, ताऱ्यात, वाऱ्यात, दऱ्या डोंगरात, नदी-सागरात, शिवाय पौराणिक, ऐतिहासिक व वर्तमानातील असो. तो वंदनीय, चिंतनीय, प्रार्थनीय विभूती आविष्कार आहे, परमात्म्याचा असेच म्हटले पाहिजे.

हे विभूती ज्ञान हाच दहाव्या अध्यायाचा विषय. परमात्म तत्व हे सर्वात सूक्ष्म नि व्यापक तत्व. या तत्वातून अकरा तत्वे (सात ऋषी + ४ मनू) उदय पावली. त्यातून ही सृष्टी पुढे निर्माण झाली.




मनू तत्व चार टप्प्यात दिसते. १) ज्ञान (शक्ती) तत्व २) विश्वव्यापक बुद्धितत्व ३) व्यक्तिगत अहं तत्व ४) शरीरान्तर्गत मन.

विश्वाची निर्मिती करणारी सप्त ऋषी व चार मनु ही कोणी ऐतिहासिक वा पौराणिक माणसे नव्हेत. ही अकरा सूक्ष्म तत्वे आहेत. विवेकानंद म्हणतात, आकाश हे पंचमहाभूतातील सूक्ष्म तत्व. हे अतिविरल द्रव्य आहे. या द्रव्यावर प्राणस्पंदनाचे आघात होऊ लागले की ते घनीभूत होऊ लागते. हे वस्तूजात हेच आकाशाचे घनीभूत रूप. म्हणून वाक् (पंचमहाभूतांची पाच द्रव्ये) व प्राण यांचे दृश्य रूप म्हणजे विश्व. परंतु मन तत्वामुळे प्राणस्पंदन सुरू होते.

सप्त ऋषी या सात तत्वांना वेदांनी सप्तपद म्हटले आहे. १) पंचभूतात्मक स्थूल सृष्टी २) वासनात्मक प्राणसृष्टी आणि ३) ज्ञानमय आत्म सृष्टी मिळून सप्तपदी, लग्नात पती-पत्नी एकत्र चालतात ती हीच सप्तपदी असावी. विश्व हे स्पंदनाचा परिणाम.

परमात्म्याचे अकरा मानस भाव हे सर्वत्र दिसणारे आहेत. स्थूल सृष्टी (पंचमहाभूते), वासनात्मक सृष्टी (प्राण), ज्ञानसृष्टी (बुद्धी) हे सप्तपदीतील सात भाव. सारी निर्मिती तपांतून (अग्नि तत्वातून) होते.

या अग्नि तत्वासाठी पुरुष-प्रकृती ही दंपती एकमेकांना आपले सर्वस्वाचे 'दान' देतात व तृप्ति (आनंद) मिळवितात. स्पंदन -प्रसरण व संकोच. प्राण-अपान, सुख-दु:ख, भय-अभय, यश-अपयश ही द्वंद्वे प्राणिसृष्टीतच दिसतात. याशिवाय बुद्धितत्व किंवा ज्ञानशक्ती ही प्राणिमात्रात विशेषत: मानवात विविधतेने व्यक्त होतात.

भूतसृष्टी-प्राणसृष्टी-ज्ञानशक्ती मिळूनच भगवंताचे अकरा मानस भाव. सातव्या अध्यायातील परा व अपरा प्रकृती या अकरा मानस भावात समाविष्ट होतात.

| | |
|---|---|
| परा प्रकृती | अपरा प्रकृती |
| \| | \| |
| ज्ञान तत्व | पंच महाभूते व |
| \| | मन-बुद्धी-अहंकार |
| ज्ञानात्मक व स्पंदनात्मकमिळून | असूधा प्रकृती |
| अक्षर तत्व | |
| यालाच | |

प्राण, अक्षर, सप्तर्षी मनू म्हणतात.

बुद्धीमंताना चिंतन-संशोधन करून स्पंदनात्मक अक्षर तत्वाचे, ज्ञान उर्जेचे (विभूती) ध्यानी येते. त्यांना विश्वाची कार्यपद्धती व एकच एक स्त्रोत ध्यानात येतो. तो एकच एक स्त्रोत म्हणजेच परमात्मा. तोच या विश्वोत्पत्तीचे कारण. त्याच्या सामर्थ्यामुळेच विश्वाला गती प्राप्त झाली आहे हे ज्ञानही त्यांना होते. या परमात्म तत्त्वाशी तादात्म्य पावून एप्रत्यता अनुभवणे हाच चिंतन संवाद ज्ञान साधनेचा आनंदाचा विषय होतो. हा जीवनव्यापार त्या परमात्म्याच्या अनुभूतीसाठी केलेली साधना झाली तर परमात्मा त्याला बुद्धीयोग देतो. हा परमात्मा कोणी दूरस्थ व्यक्ती नव्हे तर शक्ती आहे हे लक्षात घ्या.

परमात्मा आत्मा रूपाने प्रत्येकाच्या हृदयात आहेच (स्पंदन) अहम् मुळे आपणास आपण व विश्वातील एकात्मता जाणवत नाही. हा अहमभाव जाताच आत्मभाव जागृत होतो व बुद्धियोग प्राप्त होतो. (आत्मभावावर स्थिर झालेली बुद्धी म्हणजे बुद्धियोग) स्थिरबुद्धीमुळे प्रतिभेचे स्फुरण होते. परंतु परमेश्वराची कृपा होण्यासाठी, त्याला जाणण्यासाठी त्याची भक्ती करणे हे प्रयत्न मात्र नित्य नेमाने करायला हवेत. या प्रयत्नांनीच त्याच्या कृपेने अचानक प्रतिभेचे स्फुरण होते.

जे जे ऐश्वर्ययुक्त, ज्ञानऊर्जायुक्त, शक्तीसंपन्न आहे म ग त्या वस्तू असोत, व्यक्ती असोत वा प्राणी असोत त्या माझ्या चिदंशानेच उत्पन्न झाल्या आहेत. हे अर्जुना, तू लक्षात घे. यानंतर भगवंतानी अर्जुनाच्या सांगण्यानुसार आपल्या विभूती आणि योगशक्तीचे सविस्तर वर्णन केले आहे. (१९-४०)

सर्व भूतातला आत्मा (केंद्रस्थानातील उर्जा) मीच, विराट विश्वरूपात प्रगट होणारा परमात्मा मीच, आणि या विश्वाचे धारण पोषण करणाराही मीच. वैदिक देवता म्हणजे विष्णू, मरीचि, शंकर, कुबेर, अग्नि, वरुण, अर्यमा, बृहस्पती, यम, मृत्यू, गायत्री, कामदेव, बृहत्साय या साऱ्या विभूती माझ्याच आहेत. वैदिक देवता याही कुणी व्यक्ती नाहीत तर सृष्टीत अनुभवाला येणाऱ्या शक्ती आहेत. सप्त शतीत दुर्गा देवीची अशीच अनेक रूपे वर्णिली आहेत. यातील प्रत्येक रूप म्हणजे अनुभवास येणारे चैतन्यच . हे इंद्रियगम्य नाही, ज्ञानगम्य आहे हे लक्षात घ्या. वैदिक देवता वैभव, समृद्धी, दया, क्षमा, शांती, शक्ती, तृष्णश, क्षुधा, चेतना, निद्रा, बुद्धी, लज्जा, भीती, सौंदर्य याही इंद्रियगम्य नसून बुद्धीगम्यच (ज्ञानगम्य) आहेत. त्या या रुपाने व्यक्त होतात. इतिहासपूर्व कालातील पौराणिक व्यक्ती स्कंद, बृहस्पती, भृगू, उशना, नारद, चित्ररथ, कपिल, वासुदेव श्रीकृष्ण, धनंजय, व्यास, प्रल्हाद, लोकनेता राजा या असामान्य व्यक्ती श्रीकृष्ण पूर्व होऊन गेल्या म्हणून त्या विभूती. विभूतींना अंत नाही त्यामुळे त्यानंतरच्या काळातील राणा प्रताप, बाणाक्य, शिवाजी, टिळक, गांधीजी, सावरकर तसेच ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, रामदास, विवेकानंद वगैरे संत महात्मे. कुठल्याही क्षेत्रातल्या उत्तुंग, अलौकिक व्यक्तीमत्वांना विभूतीच म्हणावे लागेल. अगदी अलिकडील लता मंगेशकर, डॉ. जयंत नारळीकर, सचिन तेंडुलकर, अमिताभ बच्चन, बिसमिल्ला खाँ, ठाण्याचे माजी आयुक्त टी. चंद्रशेखर याही सर्व विभूतीच म्हणता येतील.

अशा विभूती केव्हाही, कुठेही, कुठल्याही देशात, धर्मात, जातीत जन्माला येऊ शकतात. परदेशातील न्यूटन, अब्राहम लिंकन, आईन्स्टाईन, बर्नार्ड शॉ. शेक्सपिअर, एडिसन, मदर तेरेसा, फ्लॉरेन्स नाईटिंगल अशी किती म्हणून

गावे घ्यावी नि गावी ? 'दिव्यत्वाची जेथ प्रचिती, तेथे कर माझे जुळती' असेच म्हणावे लागेल.

सूर्य हा या पृथ्वीवरील सर्व जीवांना उर्जेचा पुरवठा करणारा स्रोत. तो आपली उर्जा सर्वांना सम प्रमाणात देत असला तरी काही व्यक्तीत वा प्राण्यात ती उर्जा ग्रहण करण्याची व व्यक्त करण्याची क्षमता जास्त प्रमाणात दिसून येते. विश्व हे उर्जेचेच स्वरूप असून या विश्वाला (दृश्य स्वरूपाला) व्यक्त करणारा, गती देणारा, रुपांतर करणारा जो अनंत उर्जा सागर, उर्जा स्रोत आहे त्याला ज्ञानेश्वर 'चित्सूर्य' म्हणतात. या 'चित्सूर्यालाच' गीतेने परमात्मा म्हटले आहे. आपल्याला दिसणारा एक सूर्य याप्रमाणे अनेक सूर्य व सूर्यमाला आहेत. या सर्व विश्वाला आवश्यक उर्जा पुरविणाऱ्याला 'परमात्मा' किंवा 'चित् सूर्य'च म्हणायला हवे.

सारे विश्व त्या चैतन्याचा अभिव्यक्त झालेला अंशमात्र भाग. अजून कितीतरी उर्जा स्थाने आपल्याला अज्ञात आहेत. आपण विश्वाचा म्हणजेच साकार विश्वाचा विचार करीत आहोत. साकारता म्हणजे घनीभूत उर्जाच. तर या अनंतकोटी ब्रह्मांडाला सामावून घेणारा उर्जासागर एकच एक प्रकाशाचा सागर आहे. त्या अव्यक्त 'चित् सागराचे' आपण काय वर्णन करणार? वेदच जिथे नेति नेति म्हणतात.

परमात्म्याची कल्पना ज्यांच्या ठिकाणी चैतन्य अधिक प्रगट झालेय त्यावरून करता येईल. म्हणून ज्याच्या ठिकाणी चैतन्य अधिक प्रगट झालेय अशा वस्तू, व्यक्ती, प्राणी, पक्षी म्हणजे विभूती. भगवंत पशू पक्षातील व इतर जड पदार्थांतील ही विभूती सांगतात - उच्चैःश्रवा हा अश्व, ऐरावत हा हत्ती, कामधेनू ही गाय, सिंह, गरूड, मगर, अनंत नाग, वासुकी हा सर्प या विभूतीच. सिंहाचे तेज, हत्तीचे बळ, मगरीची शक्ती, गरूडाची झेप, सर्पाची गती, यात चैतन्य विशेषत्वाने प्रगट झालेले दिसते.

भूगोलावरील व खगोलावरील विभूती सांगितल्या आहेत. सागर, गंगा, हिमालय, वायू, मेरु, पिंपळ, चंद्र सूर्य, मार्गशीर्ष महिना, वसंत ऋतु काळ (मिय) सृष्टीचा आदि - मध्य-अंत याही विभूतीच. सृष्टीत जेथे जेथे आश्चर्यकारक सौंदर्यपूर्ण, रौद्रजनक रूपे दिसतात त्याही माझ्याच विभूती. आता त्यापेक्षाही खूप विनाशकारी अस्त्रे, शक्तीशाली शस्त्रे निघाली आहेत परमेश्वरा ! त्यांनाही तुझ्या विभूतीच म्हणायचे काय !

आयुधामध्ये इंद्राचे वज्र हे श्रेष्ठतम. काही गुणांनाही विभूती म्हटले आहे. जय, मौन, ज्ञान, सत्व, अध्यात्म विद्या, द्यूत इ. द्यूताच भगवंताचे अनिवार्य व विनाशक तेज प्रगट होते. आता त्यापेक्षाही भयानक, किळसवाणी व्यसने माणसानेच शोधली आहेत. त्या व्यसनातील रसातळाला पोहचवणारी उर्जा हिला पण विभूती म्हणून पूजायचे का? याशिवाय सर्व भूतांचे बीज, 'अकार' (बोलतांना व्यंजनात 'अकार' मिसळावा लागतो. द्वंद्व समास (दोन पदे) याही विभूतीच.

आता काही स्त्रीलिंगी गुण विभूती म्हणून सांगितले आहेत. हे फक्त स्त्रियांचे गुण नव्हेत ते शब्द स्त्रीलिंगी आहेत. उदा. कीर्ती, वाणी, स्मृती, श्री (सौंदर्य मेधा, धृती, क्षमा. इ.)

विश्व हे चैतन्याचे घनीभवन. विश्व रूपाने व्यक्त झालेले चैतन्य अंशमात्र आहे तेही इंद्रियगम्य नाही ज्ञानगम्य आहे. बुद्धियोगानेच ते समजून व जाणून घेता येईल. संपूर्ण विश्व चिन्मय आहे. जेथे अधिक सौंदर्य, अधिक ज्ञान, अधिक सामर्थ्य, अधिक उर्जा दिसते. त्या वस्तू, व्यक्ती, शक्तींना गीता 'विभूती' म्हणते. या विभूतींच्या माध्यमातूनच आपण त्या चिन्मयाचे स्वरुप समजावून घेऊ शकतो.

निर्गुण निराकार परमात्मा सगुण साकार झाल्याशिवाय कार्य करू शकत नाही. म्हणून तो केवळ चैतन्य प्रकृतीचा अंगिकार करून साकार होतो. हे अवतार परमात्म्याच्या विभूतीच. निर्गुण निराकार परमात्मा हा ध्यानाचा विषय होऊ शकतो पण ज्ञानाचा नाही. म्हणून श्रेष्ठ अशा विभूती

रुपाला 'अवतार' म्हणतात. या विभूती हेच परमात्म्याचे प्रगट रूप मानवाला जीवनात प्रेरणादायी ठरते.

'ईशावास्यामिदम् सर्वम्' सर्व विश्व ईश्वराने व्यापले आहे म्हणून सर्व वस्तू मात्रांकडे चिन्मय दृष्टीने (भगवंताचे रूप म्हणून) पहावे अशी आपली भारतीय संस्कृती सांगते. 'गीता ज्ञान विज्ञान सहितम्' म्हणजे विद्या आत्म (ज्ञान), अविद्या (विश्वज्ञान, विज्ञान) दोन्हींची मिळून उपासना करा. अविद्येने काल प्रवाहातून तरून जाल व विद्येने अमृताची गोडी जीवनात अनुभवता येईल. (परतत्व स्पर्श) जडावाचून चैतन्याला अभिव्यक्ती नाही व चैतन्यवाचून जडाचा विकास संभव नाही. जडवाद व चैतन्यवाद हे म्हणूनच एकमेकांना विरोधी नाहीत तर ते परस्पर पूरक आहेत. दोन्ही मिळून जडवाद + चैतन्यवाद = पूर्णवाद.

'विभूती' या जड व ईश्वर याना जोडणारा दुवा आहे. 'अनंत वेषे अनंत रुपे पाहिला म्या त्यासी' या ज्ञानेश्वरांच्या दृष्टीतून जर आपण सर्व जडाकडे पाहू तर 'आनंदाचे डोही आनंद तरंगच' निर्माण होतील आणि जीवन हा 'अमृतानुभव' आहे असे प्रतीत होईल.

या जडसृष्टीत 'विभूती' सुंदरतेत, भव्यतेत, विशालतेत, शक्ती सामर्थ्यात पहावयाच्या आहेत. हिमालयाची उत्तुंगता, गंगेची पवित्रता, सागराची अथांगता, आकाशाची अनंतता या भगवंताच्या 'विभूती' म्हणूनच मानायच्या. हीच जीवनदृष्टी भगवंताला सर्व प्राणिमात्रांना 'विभूती चिंतना'तूनच द्यायचीय.

'विभूती' म्हणजे भक्त व भक्त म्हणजे अनन्यता, व्यापकता, निराकारता, ज्ञानमयता, आनंदमयता, कालातीतता म्हणजेच परमात्मा. हे गुण अंगी असणे म्हणजेच भक्त होणे, योगी होणे. विभूतींमध्ये हा भगवंत भाव अधिक व्यक्त झालेला दिसतो. जडांतील विभूती, प्राणीसृष्टीतील विभूती, पक्षीसृष्टीतील विभूती व मानवातील विभूती या उत्तरोत्तर सूक्ष्मतेच्या, चैतन्याच्या पातळीवर विकास पावतात. जडता हळूहळू मागे पडते. मन-बुद्धी-अहंकार यात जडता कमी व चिदंश जास्त दिसून येतो. ज्यांच्या ज्यांच्यात हे ईश्वरी तेज प्रकट होते तेच योगी, तेच भक्त, त्याच विभूती. हे विभूतीमत्व, ज्योतिर्मय असते. ही ज्योतिर्मयता उर्ध्वगामी असते. याचे प्रतीक म्हणजे मंदिराची रचना. मंदिर कळसाकडे निमुळते होत जाते तोच कळस. जडता सोडून सूक्ष्मतेत झेप. या पुढील अध्यात्मिक विकसन म्हणजे चिदाकाशात झेपच. आकाश म्हणजे ब्रह्म! ज्ञानदेव म्हणतात या ज्योतिर्मय आत्म्याने (विभूतीने) पुढे आकाशातच झेप घ्यावी. प्रतितीच्या पंखांनी चिदाकाशात विहार करावा! असे चिदाकाशता जे आत्मे विहार करतात ते म्हणजे देव-देवता.

सर्व मानवी विभूतींची उर्ध्वगामी (वर वर चढत जाणारी) आंतरिक प्रतिक्रिया मंदिराच्या प्रतिकाने सुस्पष्ट केली आहे. मंदिर वर वर चढत निमुळते होत जाते म्हणजे जडता सोडत जाते. शेवटी कळस असतो तो म्हणजे ज्योतिर्मय आत्मात्योत. विभूतीमत्व ज्योतिर्मय असते म्हणून ज्योतीच्या आकाराने ते दाखवले जाते. कळसाचे दर्शन जडतेच्या गाभाऱ्यातील चैतन्याचेच दर्शन. कळसाचे दर्शन म्हणजे विभूतीचेच दर्शन.

जो पदार्थ वैभव, लक्ष्मी किंवा प्रभाव यांनी युक्त आहे तो माझ्या तेजांशापासून झाला आहे समज. पण हे अर्जुना हे सर्व तुला जाणून काय करायचे आहे? थोडक्यात लक्षात ठेव हे संपूर्ण विश्व मी एका अंशाने व्यापून धारण केलले आहे. अंशात्मक विश्व या अध्यायात जाणल्यानंतर पुढील ११ व्या अध्यायात अर्जुनाने विश्वरूप दर्शनाचीच इच्छा प्रगट केली आहे.

**आशा भिडे**

बी/९, विजय अपार्टमेंटस्,
'आराधना' टॉकीजजवळ,
ठाणे (प.) - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५४१ ०१४०

# अशोक नायगावकरांशी दिलखुलास गप्पा

*आमच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाती साहित्यप्रेमी विद्यार्थी गीतेश शिंदे याने मराठीतील प्रख्यात कवी श्री. अशोक नायगांवकर यांची घेतलेली ही मुलाखत - संपादक*



अशोक नायगावकर

Poetry is a spontaneous overflow of powerful feelings recollected in tranqility अर्थातच उत्कट भावनांचा सौंदर्यपूर्ण अविष्कार म्हणजे कविता ! याच कवितेमुळे बालकवींनी आपल्याला निसर्गाचा आस्वाद दिला तर पाडगांवकरांनी 'प्रेम म्हणजे प्रेम असतं, तुमचं आमचं सेम असतं.' असं सांगितलं. पण याही पलीकडे महाराष्ट्र साहित्य परिषदेचा काव्य पुरस्कार, मुक्त विद्यापीठ नाशिकचा विशाखा पुरस्कार, अहमदनगरचा संजिवनी खोचे स्मृती पुरस्कार, पाध्ये प्रतिष्ठानचा चैतन्य पुरस्कार असे अनेक पुरस्कार विजेते 'कविवर्य श्री. अशोक नायगावकर' यांनी कवितेला नवी दिशा दिली. आपल्या 'वाटेवरच्या कविता' या काव्यसंग्रहातून मुक्त छंदाची मैफील रसिकांसमोर मांडणाऱ्या व लोकसत्तेतील 'मिष्किलीच्या मिषाने' या सदराद्वारे वाचकांना आपल्या उपहासात्मक शैलीने हसवणाऱ्या व अंतर्मुख करणाऱ्या कविवर्यांशी केलेली ही लहानशी बातचीत.

**कविता या साहित्य प्रकाराची ओढ आपणास कधी आणि कशी निर्माण झाली ?**

शालेय जीवनात मराठी हा विषय माझ्या आवडीचा होता. विशेषत: मला पद्य खूप आवडायचा कारण कविता गुणगुणत असतानाच आपोआप पाठ व्हायच्या. परंतु कथा किंवा गद्य लेखनाच्या बाबतीत तसं होत नसे. एखादी कथा पटकन तोंडपाठ होत नसे, पण कविता मात्र लगेच लक्षात रहायच्या. म्हणून कवितांची पुस्तकं वाचणं याचा एक छंदच जडला आणि हळूहळू कवितांचे चिंतन, मनन करत असतानाच साधारण १६ व्या वर्षापासून माझी काव्यलेखनास सुरुवात झाली. तसेच कवितेतून कमी शब्दात जीवनाचे सार सांगता येत असल्यामुळे या साहित्य प्रकाराची मला ओढ निर्माण झाली.

**समकालीन मराठी कविता साठ पूर्वीच्या कवितेइतकी समृद्ध आहे, असे आपणास वाटते का? असेल तर आजच्या कवितेतील कोणते प्रवाह हे अधिक चागले आहेत असे आपणास वाटते ?**

साठ पूर्वी शहरातही वातावरण ग्रामीणच होतं. म्हणजेच शहरांचे आधुनिकीकरण झाले नव्हते. त्यामुळे त्या काळातील कवितांवर विशेषत: ग्रामीण भागाचा ठसा उमटलेला दिसून येतो. परंतु यंत्रयुगामुळे शहरीकरणास वेग आला. 'मर्ढेकरांच्या कवितेतून' आपल्याला यंत्रयुगाचं दर्शन घडतं. तसेच ७० ते ८० च्या दशकात दलित कवितांचा एकूणच दलित वाङ्मयाचा प्रवाह मोठा असल्याचे दिसून येते. याच दशकात मार्क्सवादी कविता देखील फुलल्या. म्हणजेच काळानुसार कवितेत बदल होत गेल्याचे दिसून येते. प्रत्येक दशकांचे जीवनदर्शन त्या त्या काळच्या कवींनी आपल्या कवितेतून करून दिले. आजच्या दशकात काही नव्या सामाजिक जाणिवांना

संजीवनी फुटल्याचे आपल्याला कवितेतून दिसून येते. म्हणजेच समकालीन मराठी कविता साठ पूर्वीच्या कविते इतकीच समृद्ध आहे, असे म्हणता येईल.

आजच्या कवितेतील कोणता प्रवाह अधिक चांगला असल्याचे सांगता येणार नाही. कारण प्रत्येक कवीची एक शैली असते आणि चांगली कविता ही नेहमीच चांगली असते, ती मनाला भावते. सामाजिक आशय असलेल्या कविता, प्रेम कविता, गझल, मुक्तछंद, चारोळ्या, हायकू हे जे कवितेचे विविध प्रवाह आहेत ते मला आवडतात. थोडक्यात सांगायचं झालं तर कवितेत आविष्कार हा महत्त्वाचा असतो आणि तो जर चांगला असेल तर कविता ही चांगली ठरते.

**'सामाजिक' या विशेषणाखाली लिहिली जाणारी कविता आक्रस्ताळी आहे' असे विधान केले तर त्यावर आपली प्रतिक्रिया काय असेल?**

या प्रश्नाचं उत्तर मला आवर्जून द्यावसं वाटतं. सामाजिक कविता या आक्रस्ताळीच असल्या पाहिजेत. आक्रस्ताळीपणा हा त्यांचा एक अविभाज्य भाग आहे. कारण सामाजिक कवितेत अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार असे विषय हाताळले जातात आणि हे विषय मनाला सुख देणारे नसतात किंवा ज्याप्रमाणे बालकवींच्या कविता वाचल्यावर मानसिक सुख मिळते त्याप्रमाणष सामाजिक विषय असलेल्या कविता वाचल्यावर तसं सुख जाणवत नाहीत. सामाजिक कविता या तिखट असतात. पायाखालची जमीन निघून जाईल असे प्रश्न या कवितेतून मांडले जातात. त्यामुळे स्वाभाविकपणे त्यात आक्रस्ताळीपणा हा येतोच. आक्रस्ताळीपणा हा सामाजिक कवितांचा गुणधर्मच आहे, असे म्हटले तरी काहीच हरकत नाही.

**लोकसत्तेत गतवर्षी येत असणारे तुमचे सदर मध्यमवर्गीय माणसाला नक्कीच आवडले होते. गद्य लेखनाची प्रेरणा आपणास कशी मिळाली ?**

लोकसत्तेतील माझ्या 'मिष्किलींच्या मिषाने' या सदराला लोकसत्तेचे सहसंपादक 'श्री. चंद्रशेखर कुलकर्णी' हे प्रेरणादायी आहेत. कारण सुरुवातीला त्यांनीच थोडं सक्तीने माझ्याकडून लिखाण करून घेतलं. त्यामुळेच आज मी लाखो वाचकांना भेटू शकलो. गद्य लेखनाची शैली देखील मला कवितेनेच दिली. म्हणजेच कविसंमेलनातून मी जे काही लोकांना हसवण्यासाठी उपहासात्मक बोलायचो त्यातूनच ही शैली विकसित झाली.

**निरनिराळ्या कार्यक्रमांच्या निमित्ताने दूरदर्शनवरूनही तुमचे दर्शन घडले, याचा आपला अनुभव कसा होता?**

दूरदर्शनमुळे जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचता येतं हा त्याचा एक मोठा फायदा आहे. पण मला हे सांगावसं वाटतं की एखादं चांगलं कार्य जर तुम्ही केलं तरच तुम्ही लोकांच्या लक्षात राहता नाहीतर तुम्ही काळाच्या पडद्याआड केव्हा जाता हे देखील कळत नाही. रोज अनेक व्यक्ती दूरदर्शनवर येऊन जातात, परंतु त्यातील मोजक्याच आपल्या लक्षात राहतात. एखादे चांगले कार्य तुमच्या नावावर असेल तर तुम्ही चिरकाल लोकांच्या स्मरणात राहता. पण जर तुम्ही जास्तच फेम मध्ये आलात तर तुम्हाला तुमचं सामान्य जीवन जगण्यात अडचणी येतात, आपलं खाजगी आयुष्य नीट जगता येत नाही, असेही काही अनुभव सांगता येतील.

**तुमचा 'कवी पचंक मंडळींचे' काव्य वाचनाचे अनुभव खूप बहारीचे आहेत, असे ऐकले आहे. या कार्यक्रमांबद्दल तुमचे काही अनुभव व्यक्त कराल का?**

आमच्या कवी पंचक मंडळात अशोक बागवे, अरुण म्हात्रे, निलेश पाटील, महेश केळुसकर, निरंजन उजगरे आणि मी इत्यादी कवी समाविष्ट होतो. आम्हा सर्वांच्या कवितांचा मिळून 'कवितांच्या गावा जावे' हा कार्यक्रम आजवर अनेक ठिकाणी यशस्वीरीत्या पार पाडला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने निरनिराळ्या गावी जाणे

झाले तेथील जीवन पहायला मिळाले, अनेक व्यक्ती भेटल्या. काही पोटभर स्तुती करणाऱ्या तर काही फक्त छान म्हणून निघून जाणाऱ्या. तसेच या कार्यक्रमातून लोकांच्या आवडी - निवडी जाणता आल्या. म्हणूनच या आमच्या कार्यक्रमात अशोक बागवे, अरूण म्हात्रे यासारखे काही गाणारे कवी देखील होते. त्यामुळे गाण्याच्या स्वरूपाची कविता ऐकल्यामुळे लोकांचा उत्साह वाढायचा,असे अनेक अनुभव गाठीशी आहेत.

**एक रसिक म्हणून तुम्हांला कोणत्या कवींच्या कविता वाचायला आवडतात ?**

असा एकच एक कवी सांगता येणार नाही. मला नारायण सुर्वेच्या कविता आवडतात, कारण त्यात सामाजिक विषय अत्यंत सखोलपणे हाताळलेले आहेत. मला यंत्रयुगावर लिहिणारे मर्ढेकर आवडतात. सदानंद रेगे, विं.दा.करंदीकर, शंकर वैद्य, कुसुमाग्रज असे अनेक कवी मला भावतात. सुरूवातीला म्हटल्याप्रमाणे मला चांगल्या कविता वाचायला आवडतात. त्यामुळे या सर्व कवींच्या विविध शैलींच्या कविता मी आवर्जून वाचतो.

**आजच्या नवोदित कवींनी कोणत्या प्रकारच्या कविता लिहिणं आपणास गरजेचं वाटतं ?**

कोणत्याही कवींच्या व्यक्ती स्वातंत्र्यावर घाला घालणं हा त्या कवींवर अन्याय ठरेल. जर एखादी दुर्धर घटना घडली व कवीला प्रेम कविता सुचली तर त्यात आक्षेपार्ह अस काहीच नाही. कारण कवीला लिहिण्याचे आणि न लिहिण्याचे देखील स्वातंत्र्य आहे. त्यामुळेच मी सांगून किंवा कोणी दुसऱ्याने ठरवून कवीने कविता लिहू नये. पण मला हे सांगावसं वाटतं की कवीने जे काही लिहावं ते आतून लिहावं, चांगलं लिहावं म्हणजे एक अर्थपूर्ण रचना होईल.

**कवितेचं पुस्तक काढावं असं आपणास केव्हा वाटलं?**

कवितेचं पुस्तक प्रकाशित करायला मी मुळीच घाई केली नाही. कविता लिहायला लागल्यानंतर पंचवीस वर्षानंतर १९९२ साली 'वाटेवरच्या कविता' हे पुस्तक मी प्रकाशित केलं. कवि संम्मेलनातून माझ्या कवितांना लोकांकडून चांगला प्रतिसाद मिळतो आहे हे जाणवल्यावरच पुस्तक काढावं असं मला वाटतं.

**कवितेची स्थिती सुधरविण्यासाठी कोणत्या प्रकारचे प्रयत्न गरजेच आहेत?**

नव्या पिढीतील मुलांचे वाचन हे अत्यंत कमी असल्याचे दिसून आले आहे. अर्थात मुलांनाही दोष देण्यात काहीच अर्थ नाही. कारण पूर्वीच्या काळात नोकरीची शाश्वती होती, परंतु आज मात्र तसं नाही. जास्तीत जास्त टक्के मिळविण्यासाठी आज मुलं फक्त अभ्यासाकडेच लक्ष देतात. कोचिंग क्लास व महाविद्यालय इत्यादींनीच मुलांचे जीवन बांधले गेले आहे. तसेच २५-३० वर्षांपूर्वी महाविद्यालयात मराठी वाङ्मय मंडळे कार्यरत होती. ही मंडळे महाविद्यालयीन जीवनातच विद्यार्थ्यांना पुस्तकांची ओढ लावत असे परंतु आज मात्र ही वाङ्मय मंडळे महाविद्यालयात कार्यरत नसल्यामुळे मुलांचे वाचनाकडे दुर्लक्ष होत आहे. जर ही अशीच परिस्थिती सुरू राहिली तर कविता लिहिल्या जातील पण त्याला वाचक मिळणार नाहीत. म्हणूनच आज कवितेची व एकूणच मराठी साहित्याची स्थिती सुधारविण्यासाठी वाङ्मय मंडळांची आवश्यकता आहे, तसेच आजच्या मुलांचे लक्ष मनोरंजनासाठी दूरदर्शनकडे किंवा संगणकावर चॅटींग करण्यात जे वळले आहे ते बदलून आपण जर कवितांचे मनोरंजनात्मक कार्यक्रम ठेवले तर कवितेची स्थिती ही नक्कीच सुधारू शकेल असं मला वाटतं.

**मुलाखत - गीतेश गजानन शिंदे**
२०३, स्वप्नजा सोसायटी,
धोबी आळी, मावळी मंडळ हॉल जवळ,
टेंभी नाका, ठाणे (प.) - ४०० ६०१.
दूरध्वनी : २५३७ १५२१

# रात्रशाळा - एक काळाची गरज

*रात्रशाळा व रात्र शाळेतील विद्यार्थी हा एक वेगळ्या अनुभवाचा व अभ्यासाचा विषय आहे. हा लेख वाचून रात्र शाळेतून आणि उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी आपला अनुभव अवश्य कळवावेत. - संपादक*

सुमारे सव्वाशे वर्षांपूर्वी ग्रँडले वाईंनी मुंबईमध्ये पहिली रात्रशाळा काढली. ती काळाची गरज लक्षात घेऊनच. त्या काळी मुंबईत नुकत्याच अनेक कापड गिरण्या सुरू झाल्या होत्या. या गिरण्यांना लागणारा मजूरवर्ग प्रामुख्याने कोकणातून आणि घाटावरून येत असे. हे सर्व मजदूर अल्पशिक्षित किंवा अशिक्षित असत. त्याकाळी गिरणीमध्ये नोकरी मिळणे आजच्यासारखे कठीण नव्हते. साहजिकच त्यांना नोकरीची अत्यंत आवश्यकता असे, ते आपले शिक्षण अर्धवट टाकून देखील गिरणीत चिकटत असत. त्याशिवाय इतर क्षेत्रामध्ये देखील काम करणारा कामगार वर्ग मुंबईत मोठ्या संख्येने होता. ज्यांना पुढील शिक्षणाची इच्छा आहे, परंतु आर्थिक कारणामुळे ज्यांचे शिक्षण अर्धवट राहिलेले आहे. त्यांना आपली शैक्षणिक गुणवत्ता वाढवता यावी, या दृष्टीने ग्रँडलेवाईंनी रात्रशाळा काढली. नंतर या रात्रशाळांची संख्या वाढतच गेली. आजमितीस एकट्या मुंबईमध्ये सुमारे १५० रात्रशाळा आहेत. सुरुवातीला या रात्रशाळांमधून कामचलाऊ किंवा गरजेपुरते इंग्रजीचे शिक्षण दिले जात असे. त्यामध्ये संभाषणात्मक इंग्रजीवर प्रामुख्याने भर असे. शिवाय व्यावहारिक अंकगणितही उपयुक्ततेच्या दृष्टीकोनातून शिकविले जात असे. परंतु नंतर दिवसाच्या शाळेप्रमाणे रात्रशाळेतील मुलांनाही पूर्वी मॅट्रिकला आणि नंतर एस्.एस्.सी. परीक्षेला बसविण्यात येऊ लागले आणि तिथून रात्रशाळेतील विद्यार्थ्यांची आणि शिक्षकांची कसरत चालू झाली आणि ही मुले दिवसाच्या शाळेतील मुलांच्या तुलनेने मागे पडू लागली.

१९७५ पासून नवीन अभ्यासक्रमाप्रमाणे एस्.एस्.सी. परीक्षा घेण्यास सुरुवात झाली आणि हे चित्र आणखी भयावह आणि चिंताजनक झाले. कारण पूर्वी इंग्रजी आणि गणित हे दोन विषय, जे विद्यार्थ्यांना उत्तीर्ण होण्याच्या दृष्टीने अडसर ठरतात, वैकल्पिक होते. त्यामुळे विद्यार्थी हे विषय सोडून देखील एस्.एस्.सी. परीक्षेला बसू शकत होते. त्यामुळे बरीचशी मुले उत्तीर्ण होऊ शकत असत. शिवाय 'स्पेशल विषय' देखील भरपूर होते. आठ विषय घेऊन त्यापैकी कोणत्याही सात विषयांमध्ये उत्तीर्ण झाल्यास विद्यार्थी उत्तीर्ण होत असे. परंतु नवीन अभ्यासक्रमाप्रमाणे सर्व सहाही विषय अनिवार्य असल्यामुळे आणि इंग्रजी-गणित यासारख्या कठीण विषयांमध्ये पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण होणे, रात्रशाळेतील विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अवघड बाब होऊन बसली आणि साहजिकच त्याच्या निकालावर अनिष्ट परिणाम व्हायला लागला. त्यामुळे काही सन्माननीय अपवाद वगळता बहुतेक रात्रशाळांचे निकाल २०% हून कमी किंवा काही वेळा ०% देखील लागायला लागले. साहजिकच शासनाच्या शिक्षणखात्याच्या नजरेला ही गोष्ट खटकू लागली. त्यातून निकाल कमी लागलेल्या शाळांना 'तुमच्या शाळेचा निकाल २०% हून कमी लागलेला आहे. सदर कारणास्तव तुमची शाळा का बंद करू नये' अशा प्रकारच्या नोटिसा बजाविण्यात येऊ लागल्या आणि स्पष्टीकरण मागविण्यात येऊ लागले.

वास्तविक, रात्रशाळांचे निकाल कमी का लागतात हे समजण्यासाठी कुणी शिक्षणशास्त्रज्ञ असण्याची गरज नाही. कमी निकालाला अनेक घटक जबाबदार आहेत. पूर्वी रात्रशाळांमध्ये केवळ आर्थिक परिस्थितीमुळे दिवसा शिकू न शकणारी मुले येत असत. त्यामुळे त्यांना

शिक्षणाबद्दल खरोखरच आस्था, तळमळ आणि कळकळ असे. त्यामुळे त्यांच्याकडे त्यांचा कल असे. हल्ली दिवसाच्या शाळांमधून दोन-दोन वर्षे अनुत्तीर्ण झाल्यामुळे काढून टाकलेली किंवा इतर काही अभ्यासबाह्य कारणांमुळे काढून टाकलेली मुले रात्रशाळेमध्ये येत असतात. शिवाय आर्थिक कारणामुळे दिवसा काम करणारी मुले देखील असतातच. या मुलांना कुठल्याच विषयातील मुलभूत ज्ञान (Basic Knowledge ) नसते. त्यामुळे अशा मुलांना शिकविणे हे रात्रशाळेतील शिक्षकांपुढे एक दिव्यच असते. रात्रशाळेची वेळ (रात्री ७ ते १०) दिवसाच्या शाळेच्या मानाने अपुरीच असते. त्यामुळे प्रत्येक विषयाच्या वाट्याला कमी तासिका येतात. रात्रशाळेतील मुले, त्यांना दिवसभर सुमारे ८ ते १० तास कष्टाचे काम करावे लागत असल्यामुळे, शारिरीक आणि मानसिक दृष्ट्या थकलेली असतात. त्यामुळे ज्ञानग्रहण करण्याच्या दृष्टीने ती तयार नसतात. या मुलांना घरी पुरेसा वेळ मिळत नसल्यामुळे शिक्षक त्यांना गृहपाठ देऊ शकत नाहीत. इंग्रजी आणि गणित या कठिण विषयांचा अडसर असतोच. सर्व सहाही विषय सक्तीचे असल्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना एकाच प्रयत्नात उत्तीर्ण होणे जमत नाही. परिणामी एस्.एस्.सी. परीक्षेचा निकाल कमी लागतो. निकाल कमी लागायला इतरही अनेक कारण आहेत. सत्य हे नेहमी कटु असते आणि ते पचवायला जड जाते.

रात्रशाळेमध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती देखील अनेक कारणांमुळे कमी असते. परंतु त्याकडे थोडेसे दुर्लक्ष किंवा काणाडोळा करावा लागतो. मुख्याध्यापक फारसे कठोर धोरण आणू शकत नाहीत. मुले उत्तीर्ण होण्याच्या दृष्टीने इ.८वी- ९ वीचे पेपर्स सोपे काढणे, पेपर्स उदारहस्ते तपासणे, कठीण पाठ्यांश न शिकविणे, एस्.एस्.सी. परीक्षेचा Paper Pattern न अनुसरणे वगैरे गोष्टी इच्छा नसून देखी नाईलाजास्तव कराव्या लागतात. शाळा चालण्याच्या दृष्टीने फारसे कडक निकाल लावणे शक्य नसते. त्यामध्ये विद्यार्थी, शिक्षक, संस्थाचालक यांचा स्वार्थ (आणि काही अंशी परमार्थदेखील) असतो, हे उघड गुपित आहे. परिणामी इ. ९ वी उत्तीर्ण होऊन इ. १० वीत आलेल्या विद्यार्थ्याला प्रत्येक विषयाचे कितपत ज्ञान असते आणि त्या ज्ञानाच्या अपुऱ्या शिदोरीवर एस्.एस्.सी. परीक्षा उत्तीर्ण होण्याचे शिवधनुष्य त्याला पेलवेल काय, ही खरोखरच अंतर्मुख होऊन विचार आणि अभ्यास करण्यासारखी गोष्ट आहे, मग यावर उपाय काय?

मला वाटते आपली कुठे तरी विचारांचीच गल्लत होत आहे किंवा विचारांची दिशाच चुकत आहे. रात्रशाळेतील मुलाची दिवसाच्या शाळेतील मुलांशी बरोबरी करणे किंवा रात्रशाळांना एस्.एस्.सी. परीक्षेच्या निकालाचा निकष लावणे, हेच मुळी चुकीचे आहे. अपंग मुलाची सुदृढ मुलाशी धावण्याची शर्यत लावण्यासारखे ते आहे. कारण रात्रशाळांतील मुलांची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, कौटुंबिक पार्श्वभूमी, त्यांच्या समस्या या दिवसाच्या शाळांतील मुलांपेक्षा भिन्न आहेत. त्यासाठी आपल्याला रात्रशाळांचा वेगळ्या दृष्टीकोनातून थोड्याशा उदारमतवादी दृष्टीकोनातून सकारात्मक दृष्टीकोनातून विचार करावा लागेल.

पहिली गोष्ट म्हणजे जी मुले पहिल्या प्रयत्नात एस्.एस्.सी. परीक्षा उत्तीर्ण होतात. त्यातील काही मुले पुढे कालेज शिक्षण, व्यावसायिक शिक्षण वगैरे घेतातच किंवा ते ज्या क्षेत्रामध्ये नोकरी करत असतात, त्या क्षेत्रामध्ये त्यांना पदोन्नती मिळू शकते. सर्वच विद्यार्थी पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण होऊ शकत नसले तरी दुसऱ्या किंवा तिसऱ्या, चौथ्या प्रयत्नात उत्तीर्ण होणाऱ्यांची संख्या बरीच असते. रात्रशाळा नसत्या तर या मुलांचे शिक्षण बंद पडले असते आणि त्यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक पर्यायाने आर्थिक विकास झाला नसता. याचाच अर्थ असा की, माध्यमिक स्तरावर स्थगन आणि गळतीचे जे भयावह

प्रमाण आहे, ते कमी करण्यास रात्रशाळांची मदतच होते. यावर काही जण असाही मार्ग सुचवतील की, १७ नंबरचा फॉर्म भरून ही मुले एस्.एस्.सी. परीक्षेला बसू शकतात आणि जिथे दिवसाच्या शाळेतील मुलांच्या बाबतीत प्रायव्हेट (बहिस्थ) मुलांचा निकाल जेमतेम १ टक्क्यांच्या आसपास असतो. तिथ रात्रशाळांतील मुले दिवसा काम करून त्यांच्या ८वी, ९वीच्या तुटपुंज्या ज्ञानाच्या जोरावर एस्.एस्.सी. परीक्षा उत्तीर्ण होतील अशी अपेक्षा बाळगणे हे फारच आशावादी होईल. दिवसाच्या शाळेतील प्रायव्हेट बसणारी मुले क्लासेसला जात असतात. रात्रशाळेतील मुले पैशाअभावी वेळेअभावी क्लासेसना जाऊ शकतील का? म्हणून शाळेत येऊनच आपले उर्वरित शिक्षण पूर्ण करणे हा त्यांच्या दृष्टीने एकमेव आणि योग्य पर्याय ठरतो आणि सर्व गोष्टी एस्.एस्.सी. परीक्षेच्या निकालाच्या तराजूनेच तोलल्या पाहिजेत असे कुठे आहे? जी मुले एस्.एस्.सी. परीक्षा उत्तीर्ण होऊ शकत नाहीत, त्यांच्या या ज्ञानामध्ये दहावी पर्यंतच्या शिक्षणामुळे काहीच भर पडली नाही, असे म्हणता येईल का? त्यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण (Schooling) हे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. त्यांच्यावर दहावीपर्यंत जे संस्कार होतात, त्यांचे काहीच मोल नाही का? दहावी पर्यंतच्या अपुऱ्या शिक्षणाच्या आधारेसुद्धा या मुलांना पोट भरण्यापुरती नोकरी मिळू शकते किंवा नोकरी करत असल्यास वरच्या पदावर बढती मिळू शकते. ही सत्यस्थिती आहे. ही मुले त्यांच्या मोकळ्या वेळात ज्ञानार्जनासारख्या पवित्र कार्यात गुंतून राहतात. ही सुद्धा माझ्या मते एक फार मोठी सामाजिक उपलब्धी आहे. अन्यथा ही मुले त्यांना चांगले छंद नसल्यास, व्यसनांच्या आहारी जाण्याचा किंवा त्यांच्या अंगी असलेल्या युवाशक्तीला विघातक वळण लागण्याचा धोका संभवतो म्हणजे सामाजिक अध:पतन किंवा नैतिक मूल्यांचा ऱ्हास रोखण्याच्या कामी रात्रशाळा महत्त्वाची कामगिरी पार पाडत असतात, असे सार्थ अभिमानाने म्हणता येईल. कामाठीपुरा सारख्या प्रामुख्याने वेश्यावस्ती असलेल्या भागामध्ये चालणाऱ्या रात्रशाळेमध्ये मी काम केलेले आहे. ज्या शाळेमध्ये वेश्यांची मुले-मुली शिक्षण घेत आहेत, हे सामाजिक उन्नयनाचे काम नव्हे का? पेपर किंवा दूध टाकणारी मुले, फुलपुड्या पोहोचविणारी मुले, धुणी-भांडी करणाऱ्या मुली कँटिनमध्ये किंवा हॉटेलमध्ये काम करणारी मुले, रात्रशाळा बंद पडल्या तर शिक्षण घेऊ शकतील का? रात्रशाळांवर होणारा खर्च आणि त्यातून मिळणारे (जे एस्.एस्.सी.परीक्षेच्या निकालावरून ठरविले जाते.) असा केवळ गुंतवणूक आणि उत्पादन या अर्थशास्त्रीय दृष्टीकोनातून विचार केला जाऊ नये. रात्रशाळांवर होणारा शासनाचा खर्च ही सामाजिक गुंतवणूक आहे आणि त्या खर्चाचा परतावा प्रत्यक्ष एस्.एस्.सी. परीक्षेच्या निकालाच्या स्वरुपात फारसा मिळत नसला तरी रात्रशाळा जी समाजसेवा आणि सामाजिक कार्य करत असतात. कुमारावस्थेतील मुलांवर योग्य संस्कार करण्याचे आणि त्यांच्या विचारांना आणि उर्जेला योग्य दिशा आणि वळण देण्याचे जे कार्य करत असतात, त्यातच शासनाने समाधान मानल्यास कमी निकालामुळे रात्रशाळा बंद करण्याचा विचार शासनाच्या डोक्यात सुद्धा येणार नाही, असे मला वाटते. कारण रात्रशाळा ही सध्याच्या काळाची गरज आहे.

श्री. प्र.द. अरदकर
सहशिक्षक
श्रीरंग विद्यालय, ठाणे,
भारत नाईट हायस्कूल, ठाणे

दिशा
नियमित वाचा.

# ऋतुचक्र - खारफुटीची लागवड

*'होप' या संस्थेच्या 'ऋतुचक्र' या उपक्रमाची माहिती - संपादक*

'होप' ही संस्था गेले ६ वर्ष ठाण्यात कार्यरत आहे. निसर्गाविषयी जागृती, निसर्ग शिक्षण आणि निसर्ग संवर्धन या विषयात संस्थेने मोलाचे कार्य केलेले आहे. निसर्ग जत्रा १९९९, २००० आणि २००१ तसेच ठा.म.पा. बरोबर वृक्षवल्ली २००१, २००२ असे कार्यक्रम यशस्वीरीत्या राबवले गेले. जंगलातील तसेच शहरातील निसर्गाची सचित्र माहिती दाखवणाऱ्या या प्रदर्शनाचा हजारो ठाणेकर आणि बाहेरील व्यक्तींनी लाभ घेतला. निसर्गविषयक स्लाईड शो, नेचर क्लब, निसर्ग सहली या आणि अशा अनेक कार्यक्रमांचे यशस्वीरित्या आयोजन हे 'होप'चे वैशिष्ट्य आहे.

गेली अनेक वर्षे ठाणे खाडीवर कचरा टाकला जात असे. ठा.म.पा.चे हे अधिकृत 'डंपिंग ग्राऊंड' होते. पण त्याचा त्रास आजूबाजूच्या नागरिकांना होऊ लागला. तसेच ठाणे शहरात शिरताना कचऱ्याचे ढीगच्या ढीग दिसत. होपने यशस्वी पाठपुरावा करत हे कचरा टाकणे थांबवले आणि त्याबरोबच त्या भागात एका निसर्ग उद्यान बनवायचा आराखडा बनवला. ठा.म.पा.ने याला त्वरित मंजूरी दिली. त्याबरोबर येथील झोपड्या, वारंवार येणाऱ्या सर्कशी थांबल्या.

ऋतुचक्र-निसर्ग उद्यान ठाणे शहराच्या पश्चिमेला, जेलच्या मागच्या बाजूस आहे. दीड किलोमीटर लांबी आणि सुमारे ऐंशी मीटर रुंदीचे हे उद्यान साडेसतरा एकर जमिनीवर विस्तारले आहे. सहा ऋतुप्रमाणे यात सहा विभाग केलेले आहेत. वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद, हेमंत आणि शिशिर. त्या त्या भागात त्या त्या ऋतूत फुलणारी झाडे लावण्याचा मानस आहे.

ऋतुचक्राची पूर्व बाजू म्हणजे खाडी ! अर्थातच येथे काही प्रमाणात खारफुटीची झुडुपे अस्तित्वात होती. या खारफुटीचे संवर्धन तसेच नवीन खारफुटी लावणे हा कार्यक्रम 'होप'ने राबवायचे ठरवले. पावसाळा संपता संपता साधारण सर्व खारफुटीनां फळे धरू लागतात. ती फळे होपच्या सदस्यांनी आणली. सुदैवाने ठाण्याच्या आजूबाजूला खारफुटीची झाडे चांगल्या प्रमाणात आहेत. त्यामुळे बिया तसेच रोपे मिळायला अडचण आली नाही.

निसर्ग उद्यानातच एका ठिकाणी नर्सरी बनवून काही बिया तेथे रुजवल्या. 'होप'चे काही सदस्य, घरून पाणी आणून ते रोज बियांना घालत होते. त्यामुळे वाढ खूप छान झाली. काही सदस्यांनी बिया तसेच रोपे आपापल्या घरी नेली आणि कुंडीत लावली. आश्चर्य म्हणजे खाऱ्या पाण्यात आढळणारी खारफुटी गोड्या पाण्यावर उत्तम रीतीने वाढते. अशी घरी वाढवलेली झाडे तसेच नर्सरीत लावलेली झाडे मग मुख्य खाडीच्या पात्रालगत चिखलात लावायचे ठरले.

त्यासाठी दुधाच्या पिशव्या आणून त्यांना भोके पाडली जेणेकरून रोपांना जमिनीत तग धरता यावी. त्या पिशव्यात मग तेथलाच चिखल भरून त्यात रोपे लावली आणि ती चिखलात रुजवली. काही ठिकाणी चिखल फार मऊ न चालण्याजोगा होता तेथे पिशव्या उंचावरून टाकल्या.

अशा रीतीने गेली तीन वर्षे २०००, २००१ आणि २००२ हा कार्यक्रम यशस्वीरित्या राबवला गेला.

(पान क्र. ३१ पहा)

# नको हा स्त्रीचा जन्म

*स्त्रीचा जन्म नकोसा वाटणाऱ्या अनेक कथा आपण पहातो, वाचतो. वंदना प्रसादे यांचे हे स्फुट त्याचबद्दल !*

'पिता रक्षति कौमर्ये, भर्ता रक्षति यौवने ।
रक्षन्ति स्थविरे पुत्रः, न स्त्री स्वातंत्र्यम अर्हति ।'

अशा अनेक रुपात तिच्या रक्षणाची जबाबदारी दुसऱ्याचीच आहे. ती स्वतंत्र नाही. दया, क्षमा, शांती, प्रेम, वात्सल्य अशा अनेक गुणांनी युक्त स्त्री जुलमाचा पिंजरा तोडू पहात आहे. जिच्या पोटी पुरुष जन्म घेतो तोच पुढे स्त्रीची दयनीय अवस्था करतो. गांधीजींनी जाणले होते. एक माता १०० शिक्षकांपेक्षा श्रेष्ठ आहे. स्त्री जर सुशिक्षित झाली तर ती आपल्या मुलांना अशिक्षित ठेवले काय?

गेल्या दोन-चार महिन्यापूर्वीची गोष्ट. आमच्या ऑफिसमधील एका मजुराच्या मुलीच्या लग्नाची पत्रिका मिळाली. मला शंका आली, हाच वयाने इतका लहान तर याची मुलगी केवढी असेल? तो पत्रिका द्यायला आल्यावर मी चौकशी केली तेव्हा तो म्हणाला, 'असेल चौदा-पंधरा वय' म्हणजे याला तेही नक्की सांगता येईना. तरी त्याच्या मते लग्नाला उशीरच झाला होता. २० वर्षापर्यंत ती ४/५ मुलांची आई होणार, आजार वाढणार, गरीबी वाढणार अन् मग मृत्यू ! त्यांना कुटुंब नियोजन म्हणजे काय केव्हा कळणार?

'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उद्धरी' याचा अर्थ इथे नेमका काय लावावा तोच समजत नाही. स्वच्छता, आरोग्य, वळण, चांगले खाणे-पिणे, शिक्षण याचे महत्त्व स्त्रीने जाणले तरच ती कुटुंब सुधारू शकेल. आज पाळणा सांभाळून अनेक आघाड्यांवर लढणारी स्त्री आपण पहातच आहोत. एव्हरेस्ट सर करण्यापासून, वैमानिक होण्यापर्यंत प्रत्येक क्षेत्रात स्त्री खंबीरपणे उभी रहात आहे. पण हा समाज तिला सुखाने जगू देत नाही. स्त्री म्हणजे भोग वस्तू / स्त्री म्हणजे अश्रू असे जणू गृहीतच धरले जाते.

लहानपणापासूनच मुलीने कसे वागावे, याचे धडे दिले जातात. योग्य तेवढे द्यायलाच हवेत, पण तिला गुलाम होऊ देऊ नका. मुलगी वयात आली की ही बंधने जास्तच कडक होतात. तिला चांगल्या -वाईटाचे ज्ञान करून द्यावे. स्वबळावर उभे राहायला शिकवण्यापेक्षा तिच्या सुखाच्या कल्पनाच बदलवून टाकल्या जातात, हे बरोबर नाही !

आजकाल नोकरीवाली बायको हवी, नाहीतर लग्न होणे कठीण म्हणून अर्थार्जनाचा मार्ग शोधायचा. एवढे करून तिला मानाने जगता येईल, याची शाश्वती नाही. नवरा चांगला मिळाला तर त्याचा पगार किती यावर त्याच्या अपेक्षा ठरतात. नाही तर भरीस भर हुंडा आहेच. हुंडाबंदी आली तरी वरदक्षिणा आहेच. त्यात काटछाट केली तरी फक्त ५०० माणसे येतील लग्न करून द्या. म्हणजे त्या मुलीने शिकूनही आपल्या वडिलांची लाज राखण्यासाठी कुठेतरी तडजोड म्हणून मनाविरूद्ध लग्नास संमती द्यायची.

स्त्री ही एक व्यक्ती आहे. माणूस आहे. तिलाही आशा-आकांक्षा आहेत. तो नुसता हाडा-मासाचा गोळा नाही. 'चूल आणि मूल' या चाकोरीबद्ध जीवनातून तिला बाहेर पडायचे आहे. आज आपण पहातोय ती परिस्थिती बदललेली नाही तर हजारो खेड्यातून स्त्री अजून दयनीयच आहे. आतापर्यंत एकतर्फी प्रेमातून मुलींवर ॲसिड फेकणे, त्यांना जाळणे, खून करणे असे गुन्हे होत होते. आता तर परवा पेपरमधील बातमी वाचली ४० वर्षांच्या स्त्रीला भर रस्त्यात पेटवले, तिच्या मदतीला कोणी धावून आले नाही. ती बिचारी गेली पर जवळाला आधार तर पाय गमावून बसलीय. काय सुरक्षितता आहे या समजात स्त्रीला?

**वंदना प्रसादे**
ठाणे (प.).
दूरध्वनी : २५४० ०६५२

# चिंतन - प्राण्यातील परमेश्वर

*विनोबाजींचे गीताप्रवचने हे पुस्तक चिंतनाचा अमोल ठेवा आहे. प्रत्येक घरात वाचलेच गेले पाहिजेत असे काही ग्रंथ आहेत. त्यात 'गीता प्रवचने'ला पर्याय नाही. दिशाच्या वाचकांसाठी १० व्या अध्यायातील प्रवचनांमधील हा एक छोटा भाग आम्ही देत आहोत. - संपादक*

रामायणात मायलेकरांचे प्रेम, भावाभावांतील प्रेम, पतिपत्नीचे प्रेम, हे सारे आहे. परंतु मला रामायण यासाठी नाही प्रिय वाटत. रामाची वानरांशी दोस्ती झाली या गोष्टीमुळे ते मला आवडते. हल्ली म्हणतात की, वानर म्हणजे नागलोक होते. जुने उकराबयाचे हे इतिहासतज्ज्ञांचे कामच आहे. मी त्यांच्या कामाविषयी तक्रार नाही करीत; परंतु रामाने खरोखरच्या वानरांशी मैत्री जोडली यात काय अशक्य आहे? राम व वानर दोस्त झाले यातच खरोखर रामाचे रामत्व व रमणीयत्व आहे. तसाच कृष्णाचा गाईशी संबंध. सर्व कृष्णपूजा यावर उभारलेली आहे. श्रीकृष्णाचे चित्र म्हटले म्हणजे सभोवती गाई असावयाच्याच. गोपालकृष्ण ! गोपालकृष्ण! कृष्णापासून गाय अलग कराल तर कृष्ण काय उरला? आणि रामापासून वानर दूर केले तर रामात तरी काय राम उरला? रामाने वानरांच्या ठिकाणचाही परमात्मा पाहिला व त्यांच्याशी प्रेमाचे, जिव्हाळ्याचे संबंध जोडले. रामायणाची ही किल्ली. ही किल्ली सोडाल तर गोडी गमवाल, पितापुत्राचे, मायलेकरांचे संबंध अन्यत्रही दिसतील. परंतु नरावानरांची अन्यत्र न दिसणारी मधुर मैत्री रामायणात आहे. वानराच्या ठिकाणचा देव रामायणाने पचनी पाडला. वानरांना पाहून ऋषींना कौतुक वाटे. रामटेकापासून तो कृष्णाकाठापर्यंत जमिनीवर पाय न ठेवता झाडांवरच्या झाडांवर उड्या मारीत हे वानर हिंडत, खेळत, अशी ती घनदाट जंगले व तेथे खेळणारे ते वानर पाहून प्रेमळ ऋषींस काव्य स्फुरे. कौतुक वाटे. उपनिषदात 'ब्रह्माचे डोळे कसे असतात' हे सांगतांना वानराच्या डोळ्यांप्रमाणे असतात असे म्हटले आहे. वानराचे डोळे चंचल, चौफेर त्याची नजर. ब्रह्माचे असेच डोळे हवेत. ईश्वराला डोळे स्थिर ठेवून चालणार नाही. तुम्ही आम्ही ध्यानस्थ बसावें; परंतु ईश्वर ध्यानस्थ बसला तर सृष्टीचे कसे होणार? वानराच्या ठिकाणी सर्वांची काळजी घेणारे ब्रह्माचे डोळे ऋषींना दिसत आहेत. वानरांच्या ठिकाणी देव पहावयास शिका.

**- विनोबा भावे**
(गीताप्रवचने)

---

(पान क्र. २१ वरून)

## ऋतुचक्र - खारफुटीची लागवड

जेथे पूर्वी खारफुटी (तिवरे) नव्हती तेथे आता ७-८ फूट उंचीची खारफुटी दिसू लागली आहे.

एखादी संस्था शहरात कार्यरत राहून निसर्ग संवर्धनाचे आणि त्याचबरोबर जनजागृतीचे भरीव कार्य करू शकते याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'होप' आणि त्यांनी केलेले ऋतुचक्र उद्यान व खारफुटीचे संवर्धन हे होय.

**- डॉ. सौ माधुरी पेजावर**
**- श्री. अमोल पटवर्धन**
'होप' सहयोग मंदिर,
घंटाळी, ठाणे (प.).

# परिसर वार्ता

एकीकडे नॅकसाठी चालू असणारी तयारी व गुलाबी, निळा दिवस, वाहनबंदी दिवस असे विविध रंगी नवरंगी दिवस यामुळे डिसेंबर महिना खूप घाई-गर्दीचा, गडबडीचा गेला. आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे नाट्य प्रेम हे तर जुनेच. नरेंद्र बेडेकर, प्रा. विजय जोशी, प्रबोध कुलकर्णी, प्रसाद कावले या सर्व नामांकित रंगकर्मींची रंगयात्रा आमच्याच परिसरातून सुरू झाली. या नाटकांचा सीझन अल्फा करंडक मुळे चांगलाच गाजला. अविस्मरणीय ठरला. तेव्हा एकांकिकेची पहिली घंटा देऊन परिसराच्या हा कानोसा.

कॉलेज विद्यार्थ्यांच्या अफाट गर्दीत आणि अमाप उत्साहात अल्फा महाकरंडक एकांकिका स्पर्धेची ठाणे केंद्राची अंतिम फेरी ९ डिसेंबर रोजी झाली. प्राथमिक फेरीतून निवडलेल्या पाच एकांकिकांमध्ये अंतिम फेरीत बाजी मारून, महाअंतिमफेरीत कोणती एकांकिका जाणार या विषयीची उत्सुकता वातावरणात दाटून राहिली होती.

जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या 'सारं वेढून तो गेला' या एकांकिकेतून प्रसाद ठोसर यांनी महाविद्यालयीन युवकांच्याद्वारे मानसिकतेमध्ये होणारे बदल, आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन यावर भाष्य करण्याचा प्रयत्न केला होता. भोगवादी दृष्टीने आयुष्याकडे बघणारा विद्यार्थी, सिनेमाच्या मायावी जगाला खरं मानणारी विद्यार्थिनी, प्रेम व्यक्त करण्याची हिंमत नसलेला युवक अशा व्यक्तिरेखांमधून जो आशय मांडण्याचा लेखकाने प्रयत्न केला तो फारच विस्कळित होता. दिग्दर्शक श्याम अधटराव यांनी उपलब्ध संहिता नेटकेपणाने रंगमंचावर मांडली. मात्र एकांकिकेची सुरुवात आणि शेवट जोडकामाप्रमाणे वाटला. लेखनात गोंधळलेल्या या एकांकिकेला कलाकारांच्या अभिनयाची चांगली साथ मिळाली. प्रसाद ठोसर यांनी उभारले परिणामकारक नेपथ्य पारितोषिक प्राप्त ठरले आणि लेखन, दिग्दर्शन, अभिनयाची पारितोषिके मिळवून एकांकिकेने प्रथम क्रमांक पटकावला.

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाने सादर केलेली शिरीष लाटकर लिखित व विजू माने दिग्दर्शित 'भीती' एकांकिका प्रेक्षकांना प्रभावित करून गेली. काहीशा परिचित कथानकातून माणसाच्या मनातील भीतीवर भाष्य करण्याचा लेखक, दिग्दर्शकाचा प्रयत्न यशस्वी झाला. कथानकांतील मानसिक विकलांग व्यक्तिरेखेची जोड आशयाला पूरक होती. ही व्यक्तिरेखा साकारणाऱ्या अभिषेक दळवीचा अभिनय सुरेख होता. सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचे पारितोषिक देऊन त्याचा उचित गौरवही करण्यात आला. पार्श्वसंगीत व प्रकाश योजनेचे पारितोषिकही याच एकांकिकेने मिळवले. आशयापासून ते सादरीकरणापर्यंत सर्वच बाबतीत प्रभावी ठरूनही ही एकांकिका अंतिम फेरीसाठी निवडली गेली नाही. याचे मात्र प्रेक्षकांना आश्चर्य वाटत होते.

जोशी-बेडेकरचे प्राचार्य माननीय स.वा.गोखले व बांदोडकरचे प्राचार्य माननीय सी.जी. पाटील यांनी विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन केले आहे.



*'भीती' मधील एका दृश्यात अभिषेक दळवी*

## विज्ञान मंडळ

बांदोडकर महाविद्यालयाचा 'सायन्स असोसिएशन'चा कार्यक्रम २३ नोव्हेंबर रोजी दुपारी थोरले बाजीराव पेशवे सभागृहात झाला. या कार्यक्रमाची सुरुवात 'सायन्स असोसिएशन'चे प्रमुख प्रा. पी.के. भट यांनी केली. प्रा. एन.डी. मांडगे यांनी पाहुणे वक्ता प्रणव पूरकायस्ता आणि त्यांची सहाय्यक रोमिया दत्ता यांची ओळख उपस्थितांना करून दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य सी.जी.पाटील यांनी वक्ता प्रणव पूरकायस्ता आणि त्यांची सहायक रोमिया दत्ता यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. सायन्स असोसिएशनचे विद्यार्थी प्रतिनिधी सौरभ हिंडालेकर यांनी देखील पुष्प-गुच्छ देऊन वक्त्यांचे स्वागत केले.



प्रणव पुरकायस्ता यांनी 'एनलिटिकल इन्स्ट्रुमेन्टस' या विषयांवर विशेष माहिती देऊन प्रोजेक्टरच्या आधारे पडद्यावर त्याचे स्पष्टीकरण केले.

या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्रा. चौधरी, प्रा.वेंकट, प्रा. न्यायते, प्रा. सेठ, प्रा. मेढेकर, पेडावर मॅडम, प्रा. राठोड, प्रा. पोतदार, प्रा. फेगडे, प्रा. अडळी, वानखेडे मॅडम, गोखे मॅडम तसेच महाविद्यालयाचे इतर शिक्षक वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. तसेच तृतीय वर्ष विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांमध्ये सायन्स असोसिएशनचे समीर तावडे, सुशिल, ब्रिजेश, राजस, अमेय, अमित या विद्यार्थ्यांनी विशेष कष्ट घेतले.

## गीतेश शिंदे याचे अभिमानास्पद यश

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील प्रथम वर्ष (पदवी) विज्ञान या वर्गातील गीतेश शिंदे याला नाशिक येथील भारतीय जैन संघटनेने आयोजित केलेल्या श्रीआनंद करंडक आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत काव्यवाचनासाठी २००१ रुपयांचे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक व सुवर्ण पदक मिळाले. या काव्यवाचन स्पर्धेसाठी राज्यातून ५५ स्पर्धक आले होते. काव्यवाचन स्पर्धा श्रीमती राधाबाई गुलाबचंद बागमार यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात आली होती.



गीतेश शिंदे

आंतर महाविद्यालयीन काव्यवाचन स्पर्धेप्रमाणेच या संस्थेने आयोजित केलेल्या कै. रमेशचंद्र बुधमल बोरा यांच्या स्मरणार्थ आयोजित केलेल्या कथाकथन स्पर्धेत गीतेश शिंदे यास स्वलिखित कथेसाठी ५०१ रुपयांचे तृतीय क्रमांकाचे पारितोषिक व कांस्य पदक मिळाले. यात ३३ स्पर्धकांचा सहभाग होता.

१३, १४, १५ डिसेंबर रोजी या स्पर्धा नाशिक येथे झाल्या. गितेशला साहित्य प्रांतात या पूर्वीही कविवर्य नारायण सुर्वे, कविवर्य मंगेश पाडगावकर आदींच्या हस्ते विविध स्पर्धेत पारितोषिके मिळाली आहेत. विद्याप्रसारक मंडळाच्या 'व्ही.पी.एम्. दिशा', 'दै. सन्मित्र' आदी

नियतकालिकांत त्याने चांगले लेखनही केले आहे. महाविद्यालयातून आपणास मिळणाऱ्या मार्गदर्शन व प्रोत्साहनाचा गीतेश कृतज्ञतेने उल्लेख करतो.

महाविद्यालयाचे प्राचार्य सी.जी. पाटील, पदवी विभागाच्या उपप्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर यांनी गीतेशचे विशेष अभिनंदन केले.

**पर्यावरण व पत्रकारिता या विषयावरील कार्यशाळा**

मुंबई येथील बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटी, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ जर्नालिझम अँड न्यू मिडिआ (बंगलोर) या संस्थांच्या वतीने बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटीत 'पर्यावरण व पत्रकारिता' या विषयावर ३ व ४ डिसेंबर २००२ रोजी झालेल्या कार्यशाळेस बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचा विद्यार्थी श्री. केतन कांवळे उपस्थित होता. 'व्ही.पी.एम.दिशा' व 'संयुजा' या नियतकालिकांचा प्रतिनिधी म्हणून महाविद्यालयाने त्याला पाठविले होते.

या कार्य शाळेला ॲडाम ग्लीन, संजय मोंगा, श्री विवेक कुलकर्णी, श्री. दीपक आपटे व देवी गोयंका या तज्ज्ञांची मार्गदर्शनपर सत्रे झाली. विविध दैनिके, नियतकालिके यांच्या प्रतिनिधींबरोबरच काही स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधीही कार्यशाळेस उपस्थित होते.



**केतन कांवळे**

केतन कांवळे हे तृतीय वर्ष विज्ञान या वर्गात वनस्पती शास्त्राचा अभ्यास करणारे कला व साहित्यप्रेमी विद्यार्थी आहेत. 'व्ही.पी.एम.दिशा'त त्यांनी लेखन केलेले असून 'संयुजा' या महाविद्यालयनी वार्षिकाचे ते विद्यार्थी प्रतिनिधी आहेत.

**शरत हेगडे व प्रदीप नामजोशी यांना माजी विद्यार्थी संघाची श्रद्धांजली**

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या 'अनुबंध' या माजी विद्यार्थी संघाच्या अस्थायी कार्यकारिणीच्या १६ डिसेंबर रोजी झालेल्या सभेत अलिकडेचआकली निधन झालेले महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी शरत हेगडे यांना व प्रदीप नामजोशी यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. महाविद्यालयातील काळापासूनच हेगडे यांनी पर्यावरण क्षेत्रातील आपले कार्य सुरू केले होते. शरत हेगडे महाविद्यालयातून १९८५ साली बी.एस्.सी. झाले होते व अद्यापही महाविद्यालयाशी संपर्क ठेवून होते. इको टूरिझम या क्षेत्रातील त्यांचे लक्षणीय काम होते.

सदर सभेसाठी संघाच्या उपाध्यक्षा व महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर व प्राणिशास्त्र विभागातील सहकारी प्राध्यापक तसेच कार्यकारिणीचे सदस्य उपस्थित होते.

**'फिजीक्स क्लब'चे उद्‌घाटन**

येथील बा. ना.बांदोडकर महाविद्यालयाच्या फिजीक्स क्लबचे उद्‌घाटन दिनांक १८ डिसेंबर रोजी सुप्रसिद्ध खगोल अभ्यासक प्रा. मोहन आपटे यांच्या हस्ते थोरले बाजीराव पेशवे सभागृहात झाले.

आपल्या भाषणात प्रा. आपटे यांनी एकविसाव्या शतकातील विज्ञान आणि पदार्थ विज्ञान या बद्दल चर्चा केली. आपल्या चर्चेत त्यांनी विसाव्या व एकविसाव्या शतकातील कालखंडाचे तीन भाग पाडले. पहिला भाग १९०० ते १९९० या काळातील लागलेले शोध व त्याबद्दलची माहिती दिली. नंतरचा कालखंड हा १९९१ ते २००२ या कालखंडात विज्ञान व तंत्रज्ञान यात झालेले

संशोधन हे अगोदरच्या १० वर्षांत झालेल्या वैज्ञानिक संशोधनापेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात झाले, असे त्यांनी सांगितले. आपल्या या सांगण्याच्या पुष्ठ्यर्थ त्यांनी आपल्या दैनंदिन जीवनातील उपयोगात येणाऱ्या गोष्टींचा जसे Mobile Phone, Internet, रेल्वेचे संगणीकृत आरक्षण यांचा दाखला दिला. पुढील २००२-२०२० या कालखंडात होऊ शकणाऱ्या भावी संशोधनाबद्दल बोलताना प्रा. आपटे म्हणाले की हे संशोधन त्या आधीच्या काळातील झालेल्या संशोधनापेक्षा अनेक पटीने जास्त असेल. त्याबद्दल विस्तृत विवेचन करताना त्यांनी सांगितले की, या काळात मानवी क्लोन जन्माला येईल. चंद्रावरील सफरी करीता खाजगी संस्था पुढाकार घेतील. संगणक क्षेत्रातील सिलीकॉन मेमरी चिपबद्दल माहिती सांगताना ते म्हणाले की, नजिकच्या भविष्यकाळात आपल्या सिलीकॉन मेमरी चिप पूर्ण क्षमतेपर्यंत उपयोगात आणू शकू. याचाच दुसरा अर्थ असा की सध्या संगणक क्षेत्रात आपण मेमरी संदर्भात दिवसागणिक जे आधुनिकीकरण जसे 2 G.B., 10 G.B., 40 G.B. (गिगा बाईटस्) बघतो आहोत त्याबर बंधन येईल व आपल्याला सिलीकॉन ऐवजी त्याचा एखादा पर्याय शोधावा लागेल. क्वांटम संगणक अस्तित्वात येऊ शकेल. आपल्या साध्या संगणकात केवळ दोनच स्थिती अस्तित्वात असतात. 'एक' अथवा 'शून्य' परंतु क्वाटम संगणकात अनेक स्थिती असू शकतात व याचा उपयोग एकाच वेळी अनेक Programme अंमलात आणायला होऊ शकतो व कॉम्प्युटरची गती पण अनेक पटीने वाढवू शकतो. त्यांच्या मते कॉम्प्युटरच्या मदतीने केलेल्या मानवीय जीनच्या decoding मुळे मानवामधील अनुवंशिक रोग अथवा विकृती यांचे समूळ उच्चाटन या तिसऱ्या कालखंडात (२००२-२०२०) निदान प्रायोगिक तत्वावर तरी शक्य आहे. त्याचाच सरळ परिणाम म्हणून मानवाची आयुमर्यादा १०० वर्षांवर वाढू शकेल. आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना संशोधनास प्रवृत्त करण्याकरिता त्यांनी भौतिक शास्त्रातील व गणितातील न उलगडलेली कोडी अथवा गूढे याविषयी विस्तृत माहिती दिली. पायची किंमत ५० दशांशपर्यंत सांगून त्यांनी प्रेक्षकांची दाद मिळवली.

आरंभी प्रा. सुरेन्द्र बापट यांनी फिजिक्स क्लब स्थापने मागची उद्दिष्टे विषद केली. प्राचार्य सी. जी. पाटील यांनी पाहुण्यांची ओळख करून देताना काही आठवणी सांगितल्या. शेवटी प्रा. सुरेन्द्र बापट यांनी आभारप्रदर्शन केले. या प्रसंगी बा.ना. बांदोडकर महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. माधुरी पेजावर, भौतिक शास्त्र विभाग प्रमुख प्रा. व्ही.डी. गोलतकर, गणित विभाग प्रमुख प्रा.आर.एस.पोद्दार आदी मान्यवर तसेच प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचा पारितोषिक वितरण समारंभ

"आम्हाला जर असे गुरुजन मिळाले नसते तर एवढ्या मोठ्या पदावर गेलो नसतो. त्यामुळे आमच्यावर संस्कार करणाऱ्या महाविद्यालयाचा सार्थ अभिमान वाटतो." असे उद्‌गार कुलगाव बदलापूर नगरपालिकेचे नगराध्यक्ष श्री. नंदकिशोर तथा राम पातकर यांनी ठाणे महाविद्यालय परिसरातील थोरले बाजीराव पेशवे सभागृहात बोलताना काढले. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी असणारे श्री. राम पातकर महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाची सुरवात ईशस्तवनाने झाली. विद्यार्थी प्रतिनिधी मंडळाचे कार्यवाह श्री. आकाश भोईर यांनी पुष्पगुच्छ देऊन व्यासपीठावरील मान्यवरांचे स्वागत केले. पदवी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर यांनी श्री. पातकर यांचा परिचय करून दिला.

प्राचार्या सी.जी. पाटील यांनी गेल्या वर्षभरातील शैक्षणिक व शिक्षणेत्तर घडामोडींची माहिती देणारा अहवाल सादर केला. 'इअर ऑफ सक्सेस' असे या वर्षाचे वर्णन करून त्यांनी विविध मंडळाच्या कार्याबाबत समाधान व्यक्त केले.

यानंतर प्रमुख पाहुणे श्री. राम पातकर यांनी 'संयुजा' या महाविद्यालयाच्या वार्षिकाचे प्रकाशन केले. समारंभाच्या अध्यक्षस्थानी असणाऱ्या विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष शिक्षणमहर्षी डॉ. वा.ना.बेडेकर यांनी ईशस्तवन सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांचे खास कौतुक करून समयोचित असे मार्गदर्शन केले. यानंतर श्री. राम पातकर व डॉ. वा.ना. बेडेकर यांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.




'CAREER FAIR' च्या Proceedings चे प्रकाशन करताना डावीकडून वि. प्र. मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर, कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, तंत्रनिकेतनाचे प्राचार्य श्री. मुजुमदार.

### करिअर फेअर

विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाच्या ISIE Student Chapter तर्फे २० ते २१ डिसेंबर २००२ रोजी थोरले बाजीराव पेशवे सभागृहात 'Career Fair' आयोजित केले होते. यावेळी विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर, उपाध्यक्ष श्री. करंदीकर, कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, तंत्रनिकेतनाचे प्राचार्य सी. श्री. मुजुमदार, उपप्राचार्य श्री. डी. के. नायक आणि संयोजिका प्रा. सौ. कीर्ती आगाशे आणि विद्यार्थी वर्ग व शिक्षकही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दीप प्रज्ज्वलनाने कार्यशाळेचे उद्‌घाटन झाले. सेमिनारच्या Proceedings चे प्रकाशन मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या हस्ते झाले.

यावेळी प्राचार्या श्री. मुजुमदार व उपप्राचार्य श्री. नायक यांनी या कार्यशाळेच्या आयोजना मागची भूमिका स्पष्ट केली. कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी या कार्यशाळेतून विद्यार्थ्यांनी स्वत:चा विकास करावा, असे सांगितले. मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा.ना. बेडेकर यांनीही विद्यार्थ्यांना काही मार्गदर्शनपर विचार व्यक्त केले.

या कार्यशाळेत विविध विषयांवर निबंध सादर करण्यात आले. त्यापैकी श्री. लिमये (संचालक, सुपरटेक इन्स्टुमेंटेशन आणि सर्व्हिसेस प्रा. लि.) यांनी 'Emerging Trends in Engineering' या विषयावर मार्गदर्शन करताना भविष्यकाळात घडू शकणाऱ्या तंत्रक्षेत्रातील बदलांची माहिती करून दिली. यानंतर श्री. वी. के. गोडबोले (संचालक, एनकॉन इंजिनिअरस् अँड कन्सलटंटस् लि.) यांनी 'Choose the right career path for progress & prosperity' या विषयावर मार्गदर्शन पर भाषण केले. श्री. पी. बी. शिरसाटे (HRD consultauts) यांनी 'Motivation & self descipline' या विषयावर भाषण केले.

श्री. सुनील खांडेकर (General Manager Marketing, Prolific System Pvt. Ltd.) यांचा विषय होता PLC & Scada Systems त्यांनी विद्यार्थ्यांना सुधारित scada पद्धती व त्याचे विशेष फायदे याविषयी माहिती दिली.



उजवीकडून श्री. अच्युत गोडबोले CEO, Apar technlogies, प्राचार्य श्री. मुजुमदार

२१ तारखेस माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील नावाजलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे श्री. अच्युत गोडबोले (CEO, Apar Technologies) यांनी 'Tommorrows work culture' या आपल्या विषयातून माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात घडणाऱ्या आमूलाग्र बदलांची विद्यार्थ्यांना जाणीव करून दिली. आपल्या प्रभावी भाषणाने त्यांनी सर्व श्रोत्यांची परिणामकारक सुसंवाद साधला.

श्री. राहुल कुलकर्णी (मार्केटिंग मॅनेजर, Siemens Ltd.) यांचा विषय होता 'Latest Trends in Tele communication'. त्यांनी टेलेकम्युनिकेशन क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञानाबद्दल माहिती दिली.

श्री. एम्.पी. कुलकर्णी (मॅनेजिंग डायरेक्टर, Ashida Electronics) यांचेही भाषण झाले. त्यांचा विषय होता 'Stand of an enterpreneur in Today's world of globalization'.

सौ. सुचेता मिराशी (संचालिका, Horizon Consultants Ltd., Thane) यांनी 'Preparation for education in U.S.' या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी अमेरिकेत उच्चशिक्षण घेण्याचे फायदे व व्हीसा मिळण्याबाबत येणाऱ्या अडचणी तसेच उच्चशिक्षणासाठी आर्थिक तरतूद कशी करावी, हे नमूद केले.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनीही विविध विषयावर निबंध सादर करून यात सहभाग घेतला. या सर्व भरगच्च कार्यक्रमात सर्व विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

२१ डिसेंबर २००२ रोजी मनुष्य बळ विकास समितीतर्फे कार्यक्रम तंत्र निकेतनाच्या ऑडियो व्हीज्युअल मध्ये आयोजित केला होता. कार्यक्रम फक्त तंत्रनिकेतनाच्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी होता. श्री. बी. बी. कुलकर्णी व्यावसायिक मार्गदर्शक यांचे भाषण यावेळी आयोजित केले होते. त्यांनी आपल्या दैनंदिन आयुष्यातील विविध उदाहरणे देऊन वैयक्तिक विकास आयुष्यात व कार्यालयात कसा घडवून आणावा, हे विशद केले.

**शैक्षणिक वर्ष २००२-२००३ मधील स्नेहसंमेलन 'पॉलिस्पार्क' एक वृत्तांत**

तंत्रनिकेतनाचे स्नेहसंमेलन 'पालिस्पार्क' २६ डिसेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत पार पडले. यात विविध कार्यक्रमांची रेलचेल होती.

दिनांक २६ डिसेंबर रोजी संमेलनाची सुरुवात रांगोळी स्पर्धेनी झाली. प्रथम पारितोषिक कु. गणेश मोरेच्या गणेश मूर्तीस मिळाले. द्वितीय पारितोषिक कु. नुपुरा चवाथे हिच्या निसर्गचित्रास तर तृतीय पारितोषिक रविंद्र तोडकरच्या गणेशमूर्तीस मिळाले.

त्याचदिवशी घेण्यात आलेल्या मेंदी स्पर्धेत कु. प्रियांका मालोदे हिला प्रथम पारितोषिक देण्यात आले. द्वितीय पारितोषिक कु. पुजा पाटील व कु. कांचन थोरात यांना विभागून देण्यात आले.

दि. २७ डिसेंबर रोजी रामकृष्ण मिशनतर्फे स्वामी विवेकानंदांच्या जीवनावरील पुस्तके व पोस्टर्स ठेवण्यात

आली होती. त्यात 'स्वामी विवेकानंदांच्या दृष्टीतून आजचा भारत' हा विषयही हाताळण्यात आला होता. दुपारी १२ वाजता फनफेअरला सुरुवात झाली. फुड स्टॉलचे प्रथम पारितोषिक पाणीपुरीच्या स्टॉलला तर द्वितीय पारितोषिक दाबेलीच्या स्टॉलला देण्यात आले. गेम स्टॉलचे प्रथम पारितोषिक Bomb diffusion च्या स्टॉलला व द्वितीय पारितोषिक Coin & Pencil च्या स्टॉलला देण्यात आले.

दिनांक ३० डिसेंबर रोजी सकाळी 'वाद-विवाद' स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. दुपारी नृत्यस्पर्धेला विद्यार्थ्यांचा भरघोस प्रतिसाद लाभला. कु. रेखा जाधवला प्रथम पारितोषिक देण्यात आले. कु. अनघा हरवंडे व कु. निखिल पुजारी यांना द्वितीय पारितोषिक विभागून देण्यात आले.




एक नृत्य

ग्रुप डान्समध्ये फ्रिडम डान्सला प्रथम पारितोषिक देण्यात आले. द्वितीय पारितोषिक कु. जितेश व ग्रुप यांना आणि कु. हितेश व ग्रुप यांना विभागून देण्यात आले.

दिनांक ३१ डिसेंबरची सुरुवात Saree Queen & Tie King च्या स्पर्धेने झाली. त्यात कु. सारंग कर्णिक याची Tie King म्हणून तर कु. अनुषा सांबशिवन हिची Saree Queen म्हणून परिक्षकांनी निवड केली.

दुपारी २ वाजता गीत गायन स्पर्धेची सुरुवात झाली. स्पर्धेसाठी मुलांना संगत करायला बाहेरून वाद्यवृंद बोलवण्यात आला होता. परीक्षणाचे कठीण काम श्री. विनय राजवाडे व श्री पुराणिक यांनी पार पाडले. कु. स्नेहा केळकर हिस प्रथम पारितोषिक देण्यात आले. कु. शैलेश गुळवे व कु. रविंद्र तोडकर यांना द्वितीय व तृतीय पारितोषिक देण्यात आले. कु. स्नेहा केळकर व कु. नेत्रा नायक यांना ग्रुप गायनाचे प्रथम पारितोषिक देण्यात आले.



'पॉलिस्पार्क', उपप्राचार्य श्री. नायक बक्षिस देताना

वरील सर्व कार्यक्रम तंत्रनिकेतनाचे प्राचार्य श्री. मुजुमदार व उपप्राचार्य श्री. नायक यांच्या प्रोत्साहनामुळे व मार्गदर्शनामुळे यशस्वीपणे पार पडले. सर्व विभागप्रमुखांचे मोलाचे सहकार्य कार्यक्रमास लाभले. कल्चरल कमिटीतील सर्व सहकारी व तंत्रनिकेतनातील इतर सर्व सहकाऱ्यांच्या मदतीशिवाय कार्यक्रमाचे आयोजन शक्य झाले नसते. हा सर्व कार्यक्रम विद्यार्थी-विद्यार्थीनींनी केलेल्या सहकार्यामुळे सुरळीत पार पडला.

प्रा. मोहन पाठक